
काव्यबन्ध
माझा
काव्यप्रवास
काव्यबंध समूहाचा दिवाळी अंक
वर्ष पहिले - दिवाळी 2023
www.mazablog.online

# अनुक्रमणिका


| सन्माननीय साहित्यिक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| काव्यबंध समूह संचालक टीम | १-४ |
| सौ. राधा खानझोडे | ५ |
| सौ. मालती चव्हाण | ६ |
| रवी आटे सानपाडा | ७ |
| केशवराव चेरकु | ९ |
| सौ. मोहिनी संजय डंगर | ११ |
| रोशनी लक्ष्मी सुंदरलाल फुलझेले | १२ |
| सौ. सुवर्णा पवार | १४ |
| श्री दत्तात्रय नामदेव गुरव | १५ |
| शालिनी सदाशिव पवार | १६ |
| श्री. मच्छिंद्र रत्नाकर झुरंगे | १७ |
| अर्चना कुलकर्णी | १८ |
| मुकेश मुकिंद | १९ |
| सौ. संगिता अभंग | २० |
| सौ. रेखा सुर्यकांत कांबळे | २१ |
| डॉ. दक्षा पंडित | २२ |
| अरविंद कुळकर्णी | २३ |
| ज्ञानदेव लक्ष्मणराव डिघुळे | २४ |
| सौ भारती राजेंद्र बागल | २५ |
| डॉ. वैशाली कमलेश शेंडगे | २६ |
| छाया प्रवीण नाळे भुजबळ | २७ |
| वीणा पाटील | २८ |
| रुपाली देव हंबर्डे | २९ |
| सौ. वंदना कुलकर्णी | ३१ |
| सुवर्णा बाबर | ३२ |
| अब्दुलकरीम शमशोद्दीन सय्यद | ३३ |
| पद्माकर दत्तात्रेय वाघरूळकर | ३४ |
| अनंत तेलंग | ३५ |
| के.पी.बिराजदार | ३६ |
| सौ. अनिता मधुकर भोई | ३७ |

# काव्यबंध समूह संचालक टीम

दिवाळी म्हटलं कि हाडाच्या वाचकाला आतुरता लागते ती दिवाळी अंकाची. काव्यबंध समूहाने देखील दिवाळी अंक प्रसिद्ध करावा हा विचार चालू होता. हा दिवाळी अंक साहित्यिकांना मार्गदर्शक ठरावा हाच माझा हट्ट होता आणि तो पूर्ण करण्यासाठी संपूर्ण टीमने खूप कष्ट घेतले आणि हा अंक तुमच्यासमोर आणला आहे. तुम्हाला हा नक्कीच आवडेल अशी अशा आहे.

नमस्कार मित्रांनो, मी मनिष अकोलकर. "काव्यबंध" समूहाचा संस्थापक. जेव्हा मी साहित्यिकांच्या वर्तुळात यायला सुरुवात केली तेव्हा माझ्या डिजिटल बॅकग्राऊंड मुळे मला अनेक अडचणी दिसून आल्या. त्यात साहित्य चोरी होण्याची शक्यता आणि उच्च प्रतिभेच्या मानाने अगदीच सामान्य प्रतीची मिळणारी सन्मानपत्रे ह्या अडचणी प्रकर्षणाने जाणवल्या. माझे मन "आपण काय मदत देऊ शकतो?" यावर सारखे विचार करू लागले. त्यातूनच जन्म झाला "काव्यबंध" या समूहाचा. जिथे मी प्रत्येक स्पर्धेत विजयी झालेल्या साहित्यिकांना सुंदर आणि योग्य दर्जाची सन्मानपत्रे देऊ शकेल आणि साहित्य चोरी होऊन नये म्हणून माझा ब्लॉग (mazablog.online) या माझ्या वेबसाईटवर कविता, लेख, निबंध इत्यादी साहित्यिकांच्या नावासहित रजिस्टर करू शकेल.

साहित्यिकांमध्ये डिजिटल माध्यमांबद्दल जागृतीकरण करण्याची गरज आज आहे. यामध्ये अनेक टप्पे आहेत आणि परमेश्वराच्या कृपेने आम्ही एकेक टप्पा यशस्वी तऱ्हेने पार करत आहोत. महाराष्ट्रातील दहा हजार पेक्षा जास्त साहित्यिकांना आमच्या समूहात जोडण्याचे स्वप्न मी पाहत आहे.

माझ्या टीमचे मनापासून आभार, कारण त्यांच्या आत्ता पर्यंतच्या निशुल्क आणि अविरत सेवेमुळेच मी एवढे मोठे स्वप्न पाहू शकत आहे. तसेच समूहात जोडले गेलेल्या सन्माननीय साहित्यिकांचे आभार त्यांच्यामुळेच हा समूह पुढे प्रगती करत आहे.



**मनिष अकोलकर**
**7020965224**
**संस्थापक - काव्यबंध समूह आणि माझा ब्लॉग**

नमस्कार मी संध्या देशपांडे, आपणा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा... 29 जुलै 2023 ला सुरू झालेला आमचा काव्यबंध हा समूह मुख्यत्वे करून साहित्यिकांच्या प्रगतीसाठी झटणारा समूह आहे. समूहात साप्ताहिक आणि मासिक काव्यस्पर्धा घेतल्या जातात. यातून समूहाचे सर्व कवी आणि कवियत्री यांच्या लिहिण्याला एक चालना मिळावी, आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत यांच्या कविता पोचाव्या हा उद्देश साधला जातो.आम्ही दीर्घ काव्यासोबत, चित्र चारोळी, विषय चारोळी,आणि समस्यापूर्ती अशा देखील स्पर्धा घेत असतो, सर्व आनंद घेऊन लिहितात.

या समूहात सर्वांना दरवेळी नवीन काही लिहिण्याची संधी दिली जाते. तसेच निवडक कविता mazablog.online या मनीष सरांच्या website वर प्रसिद्ध केल्या जातात. या द्वारे आम्ही साहित्यिकांना प्रसिद्धीसाठी एक प्रसिद्ध व्यासपीठ खुले करून दिले आहे.

आनंदाची बातमी म्हणजे काव्यबंधचा सर्वात पहिला दिवाळी अंक आम्ही तुमच्या समोर सदर करत आहोत, याचा मला अतिशय अभिमान आहे. काव्य करणे हा एक प्रवासच आहे. जर नवकवींना इतर कवींचे अनुभव वाचायला मिळाले तर त्यांची प्रगती लवकर होईल. म्हणून आम्ही हा संपूर्ण दिवाळी अंक साहित्यिकांच्या सुंदर सुंदर काव्यमय प्रवासाने भरून टाकला आहे. त्यांच्या आयुष्यातील चढ उतार नक्कीच सर्वांना काही ना काही शिकवण घेऊन येतील हीच आशा.



**सौ.संध्या देशपांडे**
**मुख्य परीक्षक**
**काव्यबंध समूह**

# काव्यबंध समूह संचालक टीम

दिवाळी म्हटलं की , क्षण सुखाचा.
आजूबाजूला पसरलेल्या दिव्याच्या पणतीचा.
मनसोक्त मिसळण्याचा, फटकांच्या आवाजाचा..

आपल्या भारतामध्ये विविध परंपरेला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि दिवाळी हा सण आला की चेहऱ्यावर हसू उमटायला वेळ लागत नाही अशाच या सुवर्णक्षणी आपण आपल्या कवितेचा स्पर्धे द्वारे दिवाळी विशेषांक काढून तुम्हा सर्वांचा आनंद द्विगुना करत आहोत,नव्या संकल्पना आणि नव्या उत्साहात कवी आणि लेखकांच्या लेखणीला नवा बहर देऊन तुमच्या या दिवाळीला आणखी काहीतरी खास करण्याचा आमचं हा उद्देश.

लोकप्रिय काव्यबंध समूहामध्ये अनेक प्रकारच्या स्पर्धा सुरू होत्या आणि साहित्यिकांनी यासाठी भरभरून प्रतिसाद सुद्धा दिला. .त्यांच्या या लिखाणातून साहित्यिकांचं आत्मसमर्पण त्यातलं अद्वितीय मोमबंधना च अनुसरत होतं. काव्यबंध समूह हा अनेक कवी आणि लेखकांना हक्काचा व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असतो. अनेक कवी आणि कवयित्री यांचे लेख कविता त्यांचे इच्छेनुसार ते त्यांच्या वेबसाईटवर टाकत असतात. इतकच नाही तर अतोनात यामागे त्यांचे परिश्रम आहे आपल्या काव्यबंध समूहामध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबवले जातात .अनेक स्पर्धा आयोजित केल्या जातात इतकच नाही तर त्या स्पर्धेचं संपूर्ण काम अतिशय चांगल्या उद्देशाने पाहणारे आमचे सर्वांचे लाडके मनीष सर आहे.
ज्यांच्या शिवाय हे उपक्रम स्पर्धा आयोजित करणे शक्यच नाही अशे आमचे स्पर्धक , साहित्यिक यांचे देखील मनापासून खूप खूप आभार मानते आणि मनापासून शुभेच्छा देते. एवढेच नाही तर आमच्या काव्यबंध समूहामध्ये सतत कार्यरत असणारी आमची संपूर्ण टीम म्हणजेच मनीष सर , आशु छाया प्रमोद (रावण) , संध्याताई देशपांडे, अनिता ताई, शीतल ताई, यांचे देखील मन:पूर्वक अभिनंदन करते आणि अश्याच प्रकारे नेहमीच कार्य करीत राहू अशी अपेक्षा करते.



प्रतिक्षा गजानन मांडवकर (स्वप्न डोळ्यातले)
8308684865
प्रमुख प्रचारक

नमस्कार,

दिवाळी दिव्यांचा सण,ज्योतीने ज्योत पेटवत जावे अन बघता बघता सारा परिसर प्रकाशमय व्हावा...फटाके, रांगोळ्या साऱ्या साऱ्या गोष्टी मानसिक समाधाना देणाऱ्या.घरात बनणाऱ्या त्या चिवडा,चकली करंजीची चव अगदी वर्षभर जिभेवर रेंगाळत रहावी अशी..सगळीकडे आनंद,जल्लोष असाच आनंद अणि प्रगतीमय जल्लोष आपणा सर्व साहित्यिक अणि वाचकांच्या जीवनात येवो ही प्रार्थना...सर्व साहित्यिक अणि वाचक वर्गाला दिवाळीच्या खूप साऱ्या शुभेच्छा...

जसा ज्योतीने ज्योत पेटवून प्रकाश पसरवता येतो तसच आताच्या इंटरनेटच्या जमान्यात एक साहित्यिक दुसऱ्या साहित्यिकाला साहित्यक्षेत्रातील विविध समूहासोबत निस्वार्थपणे जोडत आहे ही वाखाणण्याजोगी गोष्ट आहे.विचारांचा प्रकाश पसरवण्याचे काम आपण सर्व करत आहोतच पण त्या प्रकाशाची दाद आपला वाचक वर्ग देत आहे त्यांचे विशेष आभार.त्यांच्यामुळेच लिखाणाला हुरूप येते.

"काव्यबंध" या समूहाचे मनापासून आभार.साहीत्यक्षेत्रात अनेक स्पर्धा होत असतात,हल्ली ऑनलाइन चा फॅड असल्याने तर रोजच पण या समूहाची विशेषता म्हणजे इथे दिले जाणारे विषय अणि प्रमाणपत्र.

समूहाचे संस्थापक मा.मनीष सर यांना मी धन्यवाद म्हणू इच्छिते कारण त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून admin टीम ची एक सदस्य बनवली. पुन्हा एकदा दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा सर्वांना..वाचत रहा, लिखाणासाठी प्रोत्साहन देत रहा..



सौ.मोहिनी संजय डंगर
पेण,रायगड
कार्यकारी संपादक

# काव्यबंध समूह संचालक टीम

लावूनी पणत्या दिव्यांच्या, सारुया अंधार हा सारा....
करुनी तेजोमय स्वतःस, होऊया अशकारा....

अर्थात दिवाळीच्या सणामध्ये दिव्यांच्या पणत्या लावून आपल्या आयुष्यातील अंधार नाहीसा करावा आणि आपण स्वतःला सुर्यासम तेजोमय करून किर्तीवान व्हावे, नावलौकिक करावे हीच माझ्याकडून सर्वांना शुभेच्छा आहे.

तुमच्या आणि माझ्या सारखे अनेक कवी जे स्वतः अत्यंत प्रतिभाशाली असून देखील त्यांना हवी तेवढी प्रसिद्धी मिळत नाही ही गोष्ट लक्षात घेऊन मनीष सरांनी ह्या काव्यबंध नावाच्या प्लॅटफॉर्म ची स्थापना करून अनेक कवी आणि लेखकांना त्यांचं नावलौकिक करायची संधी दिली आणि स्वतः दिवसरात्र काम करून त्यांना प्रसिद्धी मिळविण्यासाठी नेहमी झटत असतात. या आमच्या काव्यबंध समुहामध्ये आम्ही सतत नावीन्यपूर्ण स्पर्धा घेत असतो तसेच त्यांच्या साहित्यांना Google च्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम आम्ही करतो. आणि हे शक्य केवळ आणि केवळ मनिष अकोलकर सरांमुळे घडू शकले. त्यामुळे त्यांनी मला सुद्धा काम करण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचा खूप खूप आभारी आहे.

मनीष सरांच्याच कल्पनेतून साकार झालेला हा आमचा पहिला-वहिलाच दिवाळी अंक आहे. ज्यात मनीष अकोलकर सरांसमवेत आमच्या परीक्षक संध्याताई देशपांडे, प्रतीक्षा मांडवकर मॅडम, मोहिनी ताई डंगर मॅडम, अनिताताई बर्गे भोसले मॅडम तसेच आमचे ग्राफिक्सकार उमेश सर ज्यांनी या दिवाळी अंकाला डिझाईन केले या सर्वांचा या दिवाळी अंकामध्ये खूप मोलाचा वाटा आहे. त्यामुळे मी सर्वांचा खूप खूप आभारी आहे.

तसेच ज्यांच्या शिवाय हा दिवाळी अंक प्रकाशित होणे अश्यक्यच आहे असे आमचे सर्व सहभागी कवी आणि लेखक यांचं सुद्धा मी खूप खूप आभारी आहे की त्यांनी आमच्या विश्वास ठेवून यात सहभागी होऊन या दिवाळी अंकाची शोभा वाढवली.
धन्यवाद....



आशु छाया प्रमोद (रावण)
मुख्य व्यवस्थापक
काव्यबंध समूह



सामर्थ्याचे विश्व व्हावे, विश्वाचा विश्वास,
आपला प्रवास असाच चालो,
जसा चालला पंढरी वारीलाच...

हाती पुस्तक मनाचे मनासाठी,
जपत संत- कवितांची कला,
पकडूनी लेखणीचा ध्यास...

प्रेम मांडी, समाज सुधारी,
घेऊनी या शब्दांचा व्यास,
चालतोय, चालणार अजुनी अजिंक्य,
आपला सर्वांचा हा काव्यप्रवास...

~ उमेश



उमेश शशिकांत गोसावी
प्रमुख ग्राफिक्सकार
काव्यबंध समूह

# काव्याची अनमोल देणगी...



"माझा काव्य प्रवास
असाच सुरू राहणार
हातात बळ आहे तोवर
आणि जोवर मी असणार..."

हा माझ्या आयुष्यातला एक आवडणारा सुखद प्रवास म्हणायलाही हरकत नाही. प्रत्येकालाच काही ना काही छंद असतातच. मला लिखाणाची आणि वाचनाची आवड शालेय शिक्षणापासूनच होती. शालेय शिक्षणाबरोबरच क्रीडा, नाटक, नकला विविध कार्यक्रमात सातत्याने माझा सहभाग असायचाच. शिक्षणानंतर लगेचच लग्न होऊन संसारात रममाण झाले मी त्या काळात१९७२ साली एस .एस. सी. डी एड, झाले दहावीला मी मेरिट होते. शिक्षिकेची नोकरी लग्नाआधीच लागली होती. काही वर्षानंतर काही घरगुती कारणामुळे मला नोकरी सोडावी लागली. मुला मुलीच शिक्षण, लग्न, सुना, नातवंड यांत आयुष्याचं अर्धशतक कधीच पार झालं होतं. आवड असूनही तिकडे वळताच आले नाही. सुना नोकरीच्या असल्याने नातवंडं मोठी करण्यात वेळ गेला.

तोपर्यंत सत्तरीच्या आसपास पोहोचले होते. मनात पक्का विचार केला जोपर्यंत यातून तुम्ही तत्परतेने सुटणार नाही तोपर्यंत संसाराच्या रगाड्यात गुरफटतच जाणार. अहो स्वत:साठी कधी वेळ काढणार?

यावर खूप विचार केला स्वतः साठी कधी जगायचं? आता जगून घ्याव, हा पक्का विचार करून हळूहळू त्यातून मार्ग काढत गेले पण मुलांना सांभाळूनच. मनात जिद्द आणि इच्छाशक्ती जर असेल त्यापासून आपल्याला कोणीच परावृत्त करणार नाही. मन खंबीर करून स्वतःच्या आवडीचा छंद जोपासला व साहित्याच्या काव्य प्रवासाला सुरुवात केली. खूप काही अभ्यास झाला नव्हता पण प्रयत्न केले. या दोन वर्षातच मी २०१९ ऑगस्ट मध्ये माझी पहिली आवृत्ती (अंतरंग) हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. आणि लगेचच चार महिन्यानंतर दुसरी आवृत्ती (आधिपत्य) ही लघु कथा कादंबरी प्रकाशित झाली. मनात जिद्द होती. कवी, आहेत लेखक-लेखिका आहेत मोठी का होईना पण मला कवयित्री, लेखिका म्हणून माझं नांव होईल आणि ती जिद्द मी पूर्ण केली.

नंतरही माझी लेखणी थांबली नाही ती सतत चालूच ठेवली. सर्वप्रथम वैष्णव ग्रुपमध्ये मी कविता लिखाणाला सुरुवात केली. या साहित्य लेखनामुळे समाजात एक कवयित्री, लेखिका म्हणून मला मानाचं स्थान मिळालं. आणि त्याहीपेक्षा सांगताना मला आनंद होतो की, या काव्य प्रवासात मला नाती आपुलकीची, नाती स्नेहाची, नाती मायेची मिळाली. समूहवर सर्वांचा खूप छान परिचय होतो. एक माझा आवडता समूह" " काव्य बंध समूह" अल्पावधीतच मला या ग्रुपचा चांगला अनुभव आला. या समूहात योग्य वेळी मार्गदर्शन , अप्रतिम सन्मानपत्र, अशा प्रकारचे सन्मानपत्र अजून माझ्या पाहणीत आले नाहीत. त्यामुळे लिखाणाला अजूनच हुरूप आला. उत्कृष्ट प्रकारचं लिखाण पाहून आपल्या लिखाणातही सुधारणा होते.

या काव्य प्रवासांच्या माध्यमातूनच मी बऱ्याच स्पर्धेत भाग घेतला. कितीतरी व्हिडिओ सादरीकरण झालेत. कितीतरी सन्मानपत्र मिळाले...ऑफलाइन कवी संमेलनात सन्माननीय पाहुण्यांच्या हातून सत्कार झाला, बक्षीस मिळाले. या काव्य प्रवासात एक वेगळीच ओळख निर्माण झाली.

या साहित्य क्षेत्रामुळे जगण्याची एक नवी दिशा मिळाली. आत्मविश्वास वाढला तसेच या प्रवासातूनच जेष्ठ प्रसिद्ध कवी, लेखक अशा महान व्यक्तींची माहिती मिळाली. त्यांचे साहित्य व मोलाचे मार्गदर्शन या साहित्य प्रवासात घडले. आणि त्याहूनही या काव्य प्रवासांत मला एक प्रोत्साहन देणारी सखी मिळाली. तिचं नाव सौ. संध्या देशपांडे भिलाई, त्या पण कवयित्री आहेत. तिच्याच प्रोत्साहनामुळे मी या काव्य बंध समूहाकडे वळले. आजही माझे वऱ्हाडी भाषेतील गीत, पोवाडे, नकला छोटे-मोठे कार्यक्रम चालूच असतात. पण या काव्य प्रवासांत आपला वेळ कसा जातो कळत सुद्धा नाही. एक आनंदाची बाब म्हणजे २ डिसेंबर २०२२ ला माझ्या स्वरचित कविता नागपूर आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित झाल्या. या साहित्यांच्या माध्यमातून मला बरेच सन्मानपत्र मिळाले. त्यात उत्कृष्ट, सर्वोत्कृष्ट, प्रथम, आणि इतर...

आज पर्यंत माझ्या कवितेला बरेच सन्मानपत्र मिळाले. प्रथम, सर्वोत्कृष्ट, उत्कृष्ट याही सन्मान पत्राचा समावेश आहे. तसेच माझे समूहवर बरेच व्हिडिओ सादरीकरण झाले. कितीतरी ऑनलाइन कवी संमेलन झाले. त्यात मी बऱ्याच वऱ्हाडी कविता सादर केल्या.

म्हणतात ना प्रत्येकाच्याच यशामागे कोणाचा तरी हात असतोच. आणि हाच हात मला टेकू म्हणून माझ्या सखीने दिला. तसेच मला भजनाची आवड असल्यामुळे हार्मोनियम ची प्रॅक्टिस करायला पण विसरत नाही. आयुष्यात काही साध्य करायचे असेल तर जिद्द आणि इच्छाशक्ती जरूर असायला पाहिजे.

हा काव्य प्रवास म्हणजे आयुष्यांला मोकळी वाट करून देणार अनमोल साधन. आयुष्यांचा विरंगुळा. नवी आशा, नवी दिशा, आयुष्याची नवी पहाट म्हणजेच माझा अति उत्तम "काव्य प्रवास".

~ सौ. राधा खानझोडे

# लेखनी माझी महामेरु



आयुष्य सुरू होतो तेव्हापासून पाच वर्षाचा असतो तेव्हाच आपल्या काव्याचा प्रवास खरं चालू होतो बालपणीचा आपलं बालगीत, बालकविता, पुटपुटत सुरुवात करतो आपली भाषा मराठी माय माझी तिच्यावर अफाट प्रेम जखडत जाते त्यांच्या स्वतःला गुंफून घेतो. जीवनाच्या प्रवासात एक काव्य भाषेचा प्रवास आनंदात सुरू करतो. आपल्या माय मराठीला आकार देतो, काव्य एक आपली छाया बनत जाते. बालपणी शिक्षक आपल्या मायबोली भाषेतून कवितांचे वाचन करतात, तेव्हा आपलं मन हे आभाळभर होऊन जातं  कवीचे शब्द कानावर पडता ओंजळी वात्सल्याच्या भरल्या जातात तेव्हा लळा लागतो तो कवितेचा मनास वाटले तेव्हा कविता पुटपुटतो व लाडाने कविता पाठ करून घेतो कवितेवर आपले माया प्रेम वाढत जाते
मोठं होऊन आपण अशा कविता वाचायला हरवली व्हायला सुरुवात करतो खेड्यातलं वातावरण बघून आयुष्यात कवीला जेव्हा चांगले वाईट अनुभव येतात तेथून कवीचा जन्म होतो कवी जन्म होतो.

जीवनरुपी सागरात आपण फार भांबावून गेलेलो असतो त्यातून आपल्या मनाच्या भावना निर्माण होतात आपल्या लेखणीतून माडतो पोट तिडकीने रसिक, वाचकापुढे पोचवण्याचा आश्वासन देत असतो. काही कवी लेखक यांना पी.एच.डी पदवी प्राप्त असते तर काही कवी लिहिता वाचता न येणारे बलाढ्य कवी होऊन गेले

उदा, बहिणाबाईंन सारख्या कवित्री त्यांच्या कविता आमरण झाल्या.

आम्ही आमचा प्रवास अशाच लहान मोठ्या कवितेतून सुरुवात केली. माझे शिक्षण एका खेडेगावात झाले माध्यमिक शिक्षण, नंतर महाविद्यालयीन शिक्षण शहरात झाले मराठी विषयावर फार प्रभुत्व होते मराठी विषय खूप आवडता होता गुरु लाभले आम्हाला मराठी विषयाला कापडे सर, डॉ. उषाताई शिंदे पीएचडी प्राप्त केली होती आफाट ज्ञानी शिक्षिका होत्या शिकवत असताना त्या जणू प्रत्यक्षात उतरत असे विद्यार्थी नसून आपल्या मुली मैत्रिणी मानत असे त्याचवेळी त्यांचे बरेच पुस्तक लेख प्रकाशित झाले मला आठवलेले त्यांचे पुस्तक म्हणजे स्त्री आकलन त्यांच्यासारखे ज्ञानी गुरु सर्वांना लावावे ज्ञानाची शिदोरी कायम पुरेल उरेल अशी कायमस्वरूपी मनात ठसून बसवली.

नंतर अडकून पडलो लग्नाच्या बंधनात शिक्षण तेथून बंद झाले जोडीदार मिळाला माय भूमीच्या सेवेवर प्रेम करणार विंचवाचव बीराड घेऊन जावं लागायचं इकडून तिकडे लिखाणापासून फार दिवस वंचित राहिलो

मुले मोठे झाले छोट्या मोठ्या कार्यक्रमात कविता करण्यास केल्या प्रारंभ ना.मो.मनोहर यांच्या स्मृतिदिनानिमित्त काव्य संमेलनात घेतला भाग मनात भीती वाटत असे, आनंदही पण होता स्टेजवर जाण्याची केली हिम्मत हो माझी कविता सर्वांना आवडली सन्मानित केलं तेथूनच झाली माझ्या काव्य प्रवासाला सुरुवात लेखणीची बनू लागली महामेरू माझ्या सखी मैत्रिणींनी मला ग्रुप मध्ये जॉईन करून घेतले 25 वर्षानंतर लिखाणाला सुरुवात केली जीवनाचे झाले सार्थक मनात आनंदाच्या लहरी उसळू लागल्या माय नाही उरली लेखणीत झाली माझी माय पुढच्या लेखनाला तुमचा आशीर्वाद घेते चुकले तर समस्व मानते मन प्रसन्न करून चालू ठेवेल काव्य प्रवास

~ सौ. मालती चव्हाण

# माझा काव्य प्रवास



प्रत्येकच व्यक्तीचा जीवनप्रवास हा एक प्रकारचे महाकाव्यच असते. सुखदुःखाच्या घटनांनी वेढलेला हा प्रवास असतो. ज्यांना जरा शब्दांची जाणीव थोडी जास्त असते व मनही तुलनात्मकदृष्ट्या संवेदनशील असते अशा व्यक्तींसाठी मग हा प्रवास वस्तुतः काव्य प्रवासच होऊन जातो . मात्र कोणी कितीही मोठा कवी असेल किंवा लेखक त्याने लिहिलेले लिखाण मग ते गद्यात्मक असो की पद्यात्मक असो ते कधीच प्रचंड नसते. शब्द आणि अक्षरे मोजता येतात. भावना देखील मोजता येतात भलेही त्यांची तीव्रता न कळो ! पण एक मात्र नक्की आहे कि कवी व ललित साहित्य लिहिणारे लेखक हे जन्मानेच कवी व लेखक असतात. कारण त्यांच्यात संवेदनशील स्वरूपाचे भाव जन्मतःच साठलेले असतात. पुढील आयुष्यात शब्दरूपाने त्या भावनांचा जरासा विकास होतो एवढेच! अर्थशास्त्र, समाजशास्त्र ,राज्यशास्त्र, मानसशास्त्र ,इतिहास, त्याचप्रमाणे गणित ,भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, अभियांत्रिकी शास्त्र, जीवशास्त्र अशा शास्त्रांच्या लेखकांबाबत मात्र असे खात्रीपूर्वक म्हटले जाऊ शकत नाही. विशिष्ट प्रकाराच्या अभ्यासाने व सरावाने ते शक्य होतेच. अर्थात त्यासाठी देखील तशी आवड असणे आवश्यकच असते.

विविध भाषांचे किंवा भाषाशास्त्राचे शिक्षण घेणाऱ्यांची बात जरा वेगळी असते. त्यांच्या कवितेतून गीतातून किंवा निबंध व लेखांतून मानवतेचे विचार मांडलेले बऱ्याच वेळा मांडलेले दिसून येतात. ही मंडळी नक्कीच थोड्या हळव्या मनाच्या असतात. अर्थातच सरासरी दृष्टिकोनानुसार. मी या कोणत्याच प्रकारात मोडत नसेल!!! मात्र माझ्याही जीवनाचा प्रवास जन्मापासून सुरूच आहे. कुटुंबातील व्यक्ति मात्र विखुरल्या गेल्यात. आई-वडिलांचे व काही भावंडांचे दूर देशी निघून जाणे, बहिणी त्यांच्या त्यांच्या घरी निघून जाणे, जीवनात काही जुने सभासद जाऊन नवीन सभासद येणे तसेच लाडका चिरंजीव व जीव की प्राण असणारी माझी कन्या यांच्यासोबत व आपणा सर्व मित्र परिवाराच्या समवेत जीवनाचा प्रवास अखंडपणे सुरूच आहे. शंभर वर्ष जगण्यापेक्षा प्रत्येक दिवशी शंभर टक्के जगणे मला पसंत असल्याने माझ्या काव्याचा प्रवास देखील दृश्य अथवा अदृश्य स्वरूपात तशा प्रकारचा होतच राहिलेला आहे.

शाळेत असताना मला भाषा विषयाची खूप आवड होती असे मात्र नक्कीच नाही. इतर विषय कठीण वाटायचे व मराठी हिंदी व त्या खालोखाल इंग्रजी विषय सोपा वाटायचा हे मात्र खरे आहे. आठव्या वर्गात असताना मी ' हे अज्ञात बांधवा' या नावाची कविता लिहिली होती. कवितेला दिलेले शीर्षक मात्र लक्षात राहिले. कविता उपलब्ध नाही तसेच नेमका भावार्थ देखील आठवत नाही. मात्र मी दहावीत असताना माझ्या लहान भावाचा मृत्यू झाला होता. त्यावेळी त्याचे वय पाच वर्षांचे होते. म्हणजेच मी आठवीत असताना तो तीन वर्षांचा असावा. मला तोअत्यंत प्रिय असल्याने त्याच्या संदर्भातच ही कविता मी केली असावी. पण आठवत नाही. मात्र 1977 -78 यावर्षी जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालयात अकरावीत शिकत असताना मला मराठीच्या पेपर मध्ये तीस पैकी नऊ किंवा सात गुण दिले होते. प्राध्यापक रवींद्र बैस सरांनी. ते अकरावीच्या चारही तुकड्यातून सर्वात अधिक होते. पेपर वाटपासाठी स्वतंत्र वर्ग भरलेला होता चारही तुकड्यांचा. त्यावेळी सरांनी माझे कौतुक केले होते. ते चांगलेच स्मरणात राहिले. अरे हो... दहावीत देखील मला हिंदी (द्वितीय) विषयात नागपूर बोर्डातून 85000 विद्यार्थ्यांमध्ये द्वितीय क्रमांक मिळाला होता. नागपूर बोर्डाचे बक्षीस देखील मिळाले होते. माझ्यासोबत माझ्या वर्गातील माझा मित्र मुकुंद केशव देशमुख यास देखील सदर विषयात माझ्या एवढेच गुण मिळाले होते. आम्ही दोघेही एकाच शाळेतील एकाच वर्गातील! योगायोग! त्यामुळे शाळेतील फलकावर आमचे दोघांचे नाव पेंटिंग करून लिहिल्या गेले होते. तो मात्र तिसावा मेरिट देखील आला होता. भावाच्या निधनामुळे माझे अभ्यासात मुळीच लक्ष न लागल्याने जेमतेम गुण घेऊनच मी उत्तीर्ण झालो होतो. फक्त 59%. अर्थात याचा माझ्या काव्यप्रवासाशी संबंध नाही.

मात्र काव्य, लेखन, निबंध वाचण्याची सवय मला दहावी अकरावीपासूनच होती एवढे नक्की. आमच्या पुलगावला रेल्वेच्या लायब्ररीमध्ये तसेच पुलगाव कॉटन मिलच्या लायब्ररीमध्ये त्याचप्रमाणे सिद्धार्थ वाचनालयात मी नेहमीच वाचन करीत असायचो. पुस्तके विकत घेण्याची सवय होती.

# माझा काव्यप्रवास

प्रवासासाठी पैसे शिल्लक राहत नसले तरीही पुस्तक विकत घेणारच. वाचनामुळे माझा आत्मविश्वास चांगलाच वाढलेला होता वय कमी असताना देखील. दहावीत असताना पुलगाव नगर परिषदेच्या झालेल्या निवडणुकीत चांगलाच सहभाग घेतला होता. त्याला वाचन हे देखील कारण असावे. नगराध्यक्ष व नगरसेवकांमध्ये बसणे उठणे त्या वयात देखील होते. त्याचे मलाही आता आश्चर्य वाटते. अठ्ठावीस वर्षांचा असताना पुलगाव येथे माननीय सेतू माधवराव पगडी यांचे गालिब, मीर व इकबाल यांचे वर तीन दिवस लायन्स क्लब मार्फत व्याख्यान झाले होते. हिंदी चित्रपटांचा इतरांसारखाच माझ्यावर झालेला प्रभाव तसेच या व्याख्यानांचा झालेला प्रभाव यामुळे देखील काव्यप्रवास रंगत गेला. बारावी विज्ञान केल्यानंतर कला शाखेकडे वळलो. अर्थातच जमत नसल्यामुळे! बीए फर्स्ट इयरला असताना जेमिनी कडू यांनी नागपूर येथे अखिल भारतीय नवोदितांचे साहित्य संमेलन ठेवले होते. त्यात सक्रिय सहभाग घेतला होता. पुढे पुढे मिरविण्याची सवय होती त्याचा कधीकधी लाभही झाला! विदर्भ साहित्य संघाच्या साहित्य संमेलनांमध्ये देखील भाग घेतला. फक्त कवी संमेलनात. विदर्भ साहित्य संघामार्फत नागपुर येथे झालेल्या श्री नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखालील निवडक कवींच्या कवी संमेलनात माझा देखील सहभाग होता. प्राध्यापक यशवंत मनोहर देखील उपस्थित होते. माझे चांगलेच कौतुक झाले होते. त्यावेळी सादर केलेली कविता आताही मला पाठ आहे. त्यावेळी मात्र माझे वय 25 -26 वर्ष एवढे असेल. महात्मा गांधी हायस्कूल, वर्धा येथे शिकत असताना श्री वामन चोरघडे कथाकार यांनी मी कथा स्पर्धेत लिहिलेल्या कथेवर फारसे चांगले अभिप्राय दिले नव्हते. ही थोडी नकारात्मक आठवण राहून गेली. तसेच अकरावी बारावीत असताना रोजच माझ्या कडे लेखक कवींची पत्रे यायची. मजा वाटायची व प्रेरणा नाही मिळायची. मात्र प्रसिद्ध वगैरे मुळीच नव्हतो. मी पत्रे पाठवायचं म्हणून त्यांची पत्रे यायची! एकदा ट्रेनमध्ये माझी कवितेची वही हरवली होती ती धामणगावच्या एका व्यक्तीला सापडली होती. त्या व्यक्तीने मला पत्र पाठविले होते. एक दिवस मी मोठा कवी बनणार असे त्यात लिहिले होते. मात्र या क्षेत्रात मला 65 व्या वर्षी देखील फारसे नाव मिळाले नाही. मंत्रालयात असताना बरेच प्रकाशक विचारायचे मात्र मी आवड दाखविली नाही. आम्ही असेच आहोत!वय 20 वर्षे असताना लहान सहान दिवाळी अंकात छापून आलेल्या कवितांमुळे मला खूपच आनंद व्हायचा. एम फिल राज्यशास्त्र या विषयाचे नागपूर विद्यापीठात (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ) शिक्षण घेत असताना वस्तीगृहाच्या नोटीस बोर्डात नियमितपणे माझ्या कविता लावल्या जायच्या. लेख लिहिता लिहिता अचानक आठवले एम ए फर्स्ट इयरला असताना यशवंत महाविद्यालय वर्धा येथील वार्षिक अंकात माझी कविता छापून आली होती. सदर कविता माझ्याकडे उपलब्ध आहे मात्र तो वार्षिक अंक नाही.

1987 -88 या वर्षात मी जनता महाविद्यालय मलकापूर जिल्हा बुलढाणा येथे पदवी वर्गांसाठी अधिव्याख्याता (प्राध्यापक असा प्रचलित शब्द आहे) होतो. त्यानंतर फार कमी लिखाण मी जीवनात केले ही वस्तुस्थिती आहे. 1992 ते 2019 या मंत्रालयातील कालावधीत मी तुरळक कविता लिहिल्या असतील. फक्त माझ्यासाठी. का कोण जाणे पण काव्य लेखनाची ही बाब मी सर्वांपासून लपवून ठेवली होती. संविधानाच्या प्रशिक्षणाचे काम 9-10 वर्ष मोठ्या प्रमाणावर मंत्रालयात केले. मात्र काव्य लेखनच्या संदर्भात शून्य प्रगती. अर्थात प्रशिक्षण देताना किंवा इतरत्र भाषण देताना संदर्भानुसार मराठी हिंदी उर्दूच्या काव्याच्या ओळी नकळत मुखी येऊन जात. त्यामुळे कदाचित कर्मचारी अधिकारी माझे व्हिडिओ काढत असावेत! पिंडच मुळात तसा! मला काव्य लेखनाची गोडी आमच्या पुलगाव येथील स्वर्गीय नंदकुमार येंडे तसेच आदरणीय ज्येष्ठ मित्र डॉक्टर प्रवीण शुक्ला तन्मय एम ए, एम कॉम, पीएचडी , साहित्यरत्न व्हेरायटी क्लोथ स्टोअर पुलगाव(आता यवतमाळ) यांच्या सानिध्यात लागली. त्यामुळे माझे काव्य लेखनाचे प्रेरणास्थान डॉक्टर प्रवीण शुक्ला तन्मय हेच आहेत. काव्याच्या संदर्भात त्यांच्याशी दूरध्वनी वरून एक एक तास बोलणे होते. एवढ्यात मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यांनी माझी कविता ऐकणे म्हणजे लाखो रसिकांनी कविता ऐकल्यासारखे मला वाटते. खरेच! ते स्वतः अत्युच्च दर्जाचे हिंदीचे कवी आणि गीतकार आहेत. माझ्या काव्य प्रवासात मी थोडे उर्दू लिपीचेही ज्ञान अर्जित केले. उर्दू साक्षर असल्यासारखे थोडे थोडे वाचता येते. बऱ्याच उर्दू शब्दांचे अर्थ देखील माहित आहेत. माझ्या काव्य प्रवासाचा हा एक भाग समजण्यास हरकत असू नये.

असे करीत करीत ज्याचा मला शोध होता ते थोड्याफार प्रमाणात वातावरण अलिकडे उपलब्ध झाले. कवी जितेंद्र लाड व प्राचार्य रवींद्र पाटील सर यांचा एक कविता डॉट कॉम हा नवी मुंबईत समूह आहे. त्यांनी चक्क माझ्या अध्यक्षतेखाली एक कवी संमेलन घेतले. यामध्ये आपला काव्यबंध समूह मला भेटला. एखादा कवी मित्र भेटल्या प्रमाणे. त्यानंतरही साहित्याच्या अनेक समूहात माझा प्रवेश झाला .मात्र मी केवळ आपल्या समूहासाठीच प्रामुख्याने लिखाण करीत आहे. आमचा सर्वांचाच काव्यप्रवास त्यामुळे चांगल्या वळणावर आला आहे असे वाटते. मनीष सरांचे... आशु रावण यांचे व टीमचे तसेच कवयित्री संध्याताई देशपांडे यांचे प्रोत्साहन असेच मिळत राहो. मिळत राहील अशी आशा व विश्वास देखील आहे.

~ रवी आटे सानपाडा

# माझा काव्य प्रवास



माझा काव्याचा प्रवास
सुरु आहे तो जरा संथ।
पण तो थांबणार नाही
येईसतो आयुष्याचा अंत।।
- केशवराव चेरकु.

माझा काव्य प्रवास ठरवून झाला नाही. मुळात मी तेलुगू भाषिक असल्यामुळे घरी थोडी तेलुगू आणि हिंदीचा भाषेचा वापर होता. आज ही तसाच आहे. मी अमरावतीकर म्हणजे शहरात राहणारा. विदर्भात शहरात मराठी भाषिक पण बाहेर हिंदीच बोलतात. त्यामुळे हिंदी भाषेचा पगडा जास्त. पण नियतीला कदाचित वेगळंच मान्य होत. मी पाच वर्षांचा असेल तेव्हा वडील गेले. सर्व जबाबदारी आई वर आली. आईला आम्हा तिघे भावंडांची जबाबदारी पेलणे तिच्या आवाक्या बाहेरची गोष्ट होती. माझी आत्या एका खेडेगावात (तोंडगाव ता.अचलपूर) बालवाडी शिक्षिका होती. तिला ही व्यथा लक्षात आली. ती माझ्या आईला म्हणाली, की मी तुला पैशाची मदत करु शकत नाही. पण तुझ्या तीन मुलांपैकी एकाला मी घेऊन जाते माझ्याकडे ठेवते, शिकला तर मला शक्य आहे तेवढे शिकवेल. आईला ते पटलं म्हणून तिने मला पाठवण्याचा निर्णय घेतला. अन् माझी रवानगी आत्या बरोबर तोंडगावला झाली. ज्याच वय पाच वर्ष हिंदी शिवाय कुठलीच भाषा न समजणारा.

गावात शंभर टक्के मराठी बोलणारे. मला बालवाडीत बसवले गेले. तेथे ही मराठी माध्यम आणि पुढे शाळेत गावातील जिल्हापरिषदची मराठी शाळा. त्यामुळे आणायास मराठीत मी रुळलो. दहावी पर्यंत मराठी माध्यमात शिकलो कविता वाचनाची नववी दहावीत मला खूप आवड लागली. शाळेतील हुशार विद्यार्थ्यांत गणना व्हायची म्हणजे सातवी पर्यंत वर्गात पहिला असायचो. पण स्वभाव बुजरा असल्यामुळे मी फार कमी बोलायचो. ती सवय आज ही आहे. कमीत कमी बोलणे. तसेच खेळात प्राविण्य होते. शाळेच्या खो खो टीमचा कर्णधार होतो. पुढे कॉलेज मध्ये हॉकी आणि फुटबॉल टीमचा कर्णधार होतो. इंटर कॉलेज स्पर्धा मध्ये भाग घेऊन कॉलेजला ट्राफी मिळवून दिल्यामुळे कॉलेज मध्ये खेळाडू म्हणून जास्त प्रसिद्ध होतो. इंजिनिअर व्हायचे स्वप्न शाळेत असतानाच ठरवलं होतं. त्यामुळे अकरावी बारावीला सायन्स मध्ये प्रवेश घेतला . पुढे इंजिनिअरींगला प्रवेश मिळाला नाही कारण त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रात आठच इंजिनिअरींग कॉलेज होते. त्यात विदर्भात फक्त दोन. त्यासाठी सात जिल्ह्यातून मूल येणार त्यामुळे एडमिशन खूप कठीण असायची. पण जिद्द होती की इंजिनिअर व्हायचे म्हणून मी बीएससी न करता अमरावती येथे पॉलिटेक्नीकला इलेक्ट्रीकल इंजिनिअरीग मध्ये प्रवेश घेतला. कॉलेजमध्ये असताना. कॉलेजच्या वार्षिक अंकात आपलं ही नावं यायला पाहिजे म्हणून एक कविता लिहिली होती. "मृगजळ". त्या कवितेच शिर्षक होत. पहिल्याच वर्षी ती छापून आली आणि सर्वच मित्रांना आवडली. त्यांच्या प्रोत्साहनाने दरवर्षीच्या अंकासाठी मी एक कविता लिहायचो. कॉलेज संपलं. ती कविता ते अंक सांभाळून ठेवले नाही.

पॉलिटेक्नीक झाल्यावर मला एअर इंडियाला नौकरी मिळाली. म्हणून मुंबईत आलो आणि धावपळीच्या यांत्रिक वातावरणात असा गुंतलो. घर, ड्युटी, संसार यांच्या पलीकडे विचार करायला वेळच मिळेना. खेळ, कविता आणि काही छंद गुंडाळून ठेवायला लागले. एवढ्या व्यस्ततेमुळे कविता वगैरे सर्वच विसरुन गेलो.

जेव्हा २०१९ मध्ये मी सेवानिवृत्त झालो. तसा मी इंजिनिअर असल्याने साहित्यिक लोकांशी माझा दूरदुर पर्यंत संबंध नव्हता. आणि साहित्यिक वाचन वगैरे नव्हत. पण मला वेळ मिळायला लागला. मग एक दिवस " प्रवास " छोटी सी कविता लिहिली. व्हाटस् अप् वर मित्रांना पाठवली. सर्वांना आवडली. सर्वांना आवडली म्हणून मित्रांनी सल्ला दिला, छान लिहितोय लिहीत रहा. असा माझा काव्य प्रवास परत सुरु झाला. २०२० ला लाकडाऊन मध्ये मग वेळच वेळ होता आणि बाहेर ही जाता येत नव्हतं. त्यामुळे वाचन/ लिखाण /टी.वी बघणे एकमेव विरंगुळा होता. त्या काळात बऱ्याच वेगवेगळ्या विषयांवर कविता, लघुकथा, सत्यकथा लिहिण्याचा योग आला. एका कवियत्रीच आत्मचरित्र लिहण्याचं भाग्य मला लाभलं. पण त्यातलं काही छापून प्रसिद्ध कराव यात मला रस नव्हता. स्वभाव पुढे पुढे करण्याचा नसल्याने व प्रसिद्धी लोलुपही नसल्याने तसा प्रयत्न पण मी केला नाही. हे लिखाण करत असतानाच शायरी पण लिहायचो, त्यामुळे उर्दू हिन्दी मिश्रीत कविताही मी काही लिहिलेल्या आहेत.

# माझा काव्यप्रवास

नवी मुंबईत रंगश्री आर्टिस्ट ग्रुप आहे. माझे मित्र/ नातलग श्री महेशजी गर्दे यांच्या माध्यमातून रंगश्री ग्रुपशी जुळलो. तसा बघता हा ग्रुप गाणे गाणाऱ्याचा आहे. पण त्यांचं मोठेपण मी गाणारा नसुन त्यांनी मला त्या ग्रुपमध्ये सामावून घेतले. त्या ग्रुपच्या कार्यक्रमाला मी माझ्या मराठी, हिंदी कवितेच वाचन करायचो. त्याच एका कार्यक्रमात कवी जितेंद्र लाड यांची ओळख झाली. ते त्यांचा कविता डाट कॉम हा उपक्रम चालवतात. त्यासाठी त्यांनी मला निमंत्रण दिल. त्यांच्या उपक्रमात ते मुलांना लहानपणापासुनच मुलांमध्ये कविता लिहिण्यासाठी आणि सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून द्यायचा मानसं ठेवून उपक्रम चालवतात. त्यासाठी गावोगावी जाऊन मुलांना सोबत घेऊन जाऊन कविता सादर करतात. त्या उपक्रमाशी मी जोडल्या गेलो. तिथेच श्री रविंद्र पाटील यांच्याशी ओळख झाली. त्यांच्या कविता डॉट कॉम या कार्यक्रमात मी माझ्या कविता वाचन करतो. काही स्पर्धा मध्ये भाग घ्यायला सुरुवात केली. त्यातूनच  काव्यबंध समुह, साहित्य समुहांला पण  मी जोडल्या गेलो. या ग्रुप मध्ये खुप छान वातावरण आहे. सर्व एकमेकांना समजून घेतात, प्रोत्साहन देतात. आयोजक ,परिक्षक खूप मेहनत घेऊन उपक्रम चालवतात. बाकी लिखाणा व्यतिरीक्त बऱ्याच सामाजिक कार्यात मी व्यस्त असल्याने या ग्रुप मधील सर्वच स्पर्धा मध्ये भाग घेणं शक्य होत नाही. याच दु:ख नक्कीच आहे. ग्रुप मधील सर्वच कवी, कवियत्री यांना माझ्या मन:पुर्वक शुभेच्छा. असा माझा कविता/लेख लिहिण्याचा छोटासा प्रयत्न आहे. छोटासा काव्य प्रवास आहे. तो शेवटपर्यंत चालूच राहिल.

कोई हसा गया तो कोई रुला गया
हर शख्स हमको कुछ सिखा गया।
तजुर्बेसे कुछ सिख ली हमनें मगर
नादानीमें सबकुछ हमने गमा दिया।।

~ केशवराव चेरकु



# माझा काव्य प्रवास

लांबच्या पल्ल्याच्या प्रवासाला लाल रंगाच्या बसमधून निघावं,अन प्रवासात आजूबाजूच्या निसर्गाचे निरीक्षण करता करता काहीतरी भन्नाट,वेगळी गोष्ट दिसावी,मनात त्या गोष्टीने घर करावा आणि पुन्हा पुन्हा ती गोष्ट बघावीशी वाटावी,डोळ्यात साठवाविशी वाटावी...तो आनंद वेगळाच मन तृप्त करणारा...आत्मिक आनंदाचा असतो क्षण!! तसाच काहीसा माझा काव्यप्रवास!!!

मस्तकावर चौसष्ट कलांचा अधिपति श्रीगणेशाचा हस्त असणारी मी लहानपणापासूनच नवीन गोष्ट शिकण्यासाठी आतुर असायचे..स्वभावाने लाजरी असल्याने लगेचच हे मला शिकवा किंवा कसे केले ते सांगा असे न म्हणता,निरीक्षण करून स्वत: चुकत माकत बऱ्याच कला अवगत केल्या.गाणी गायला आवडायची.हिंदी,मराठी,इंग्रजी गाणी ऐकताना त्यात मी रममाण व्हायचे..हळूहळू एकांत सिंगर बनले म्हणजे जेव्हा कधी एकटी असायचे तेव्हा गाणी गायचे..स्वतःसाठी...बाकी छंद आवड म्हणून जपले गेले अभ्यास करून वेळ मिळेल तसे. नववीत असताना शाळेच्या वर्धापनदिनानिमित्त भेट म्हणून कविता लिहावीशी वाटली..अर्थात ती कविता माझ्या बुद्धीप्रमाणे रचली गेली..काही मोठे असे विचार त्यातून व्यक्त गेले नव्हते पण ती पहिली कविता अजूनही स्पष्ट आठवते..."ध्येयपूर्ति"

**ध्येयपूर्ति**



आई बाबांनी केले संस्कार
गुरुजनांनी दिले ज्ञान
पार करेन यश शिखरे
वाटेल सर्वांना अभिमान

दु:ख मिळो वा सुख मिळूदे
मी स्तब्ध हिमालय बनेन
अडथळे येऊदे कितीही
ध्येयपूर्ति साठीच लढेन

सूर्यासारखा तळपेन मी
ज्ञानाचे तेज झळकवेन
कोणी म्हणेल दिवा मजला
तपस्वी होउन चमकेन

कल्पवृक्ष होऊन जगेन
आधार दुर्बळांचा होईन
संकटांना कलाटणी देत
ताठ मानेने उभा राहीन

राखलेले जपायचे मज
उत्तम व्यक्तिमत्त्व व्हायचे
कष्ट करून कठीण मार्ग
सोपे बनवून जगायचे....

कविता वाचन करायला पण जगाची लाज मला म्हणून थेट ग्रंथालय गाठले,गौरी होनावर माझ्या जूनियर के जी पासूनच्या शिक्षिका त्यांना भेटून कविता दाखवली,गुणी विद्यार्थिनी म्हणून त्या माझे नेहमीच कौतुक करत पण त्यादिवशी त्यांनी पाठीवर दिलेली थाप आत्मविश्वास देऊन गेली..मॅडम नि मला मुख्याध्यापकांच्या ऑफिस मधे नेले अणि कविता त्यांच्या हाती सुपूर्त केली..त्यांनीही माझे जोडले जुळवलेले शब्द आवडले अणि शाळेच्या मुख्य फलकावर माझी कविता लावण्यात आली.स्वतःचा अभिमान वाटला...

लहानपणापासून वाचनाची आवड वैगरे अस काही नव्हतं.शाळेत सगळया म्हणजे ज्यात मला interest होता अशा माझ्यासाठी सगळया स्पर्धांमध्ये बक्षीस मिळवली..आणि गंमत अशी की बरीच बक्षीस ही पुस्तकांच्या स्वरुपात होती जेव्हा जेव्हा क्रमांक जाहीर झाले मी खुश असायचे आणि पुस्तक बक्षीस मिळाले की हिरमोड.मग तसेच ते पुस्तक पप्पांच्या ड्रोवर मधे ठेवायचे.अभ्यासा पुरतेच वाचन...विज्ञान शाखेतून graduation पूर्ण केले.पण कविता लिहायचा योग आला नाही..

नेहमी वाटायच शिक्षक व्हाव. ज्ञान दान हेच सर्वश्रेष्ठ दान हे मनात बिंबवल होत..म्हणून लग्नाआधी 6 वर्ष स्वतःचे कोचिंग क्लास चालवले(माफक फि घेऊन). रांगोळी, मेहंदी, टाकावू पासून टिकावू वस्तू बनवणे, शिवणकाम, संगीत, जुन्या साड्यां पासून विणकाम, नवनवीन पदार्थ बनवून आवडीने सगळ्यांना खाऊ घालणे,मेकअप करणे स्वत आणि दुसऱ्याचा ही. पेंटिंग,स्केचिंग...बऱ्याच गोष्टी आवड म्हणून शिकले...

वाचनाची सवय 2015 मध्ये मला माझ्या एका विद्यार्थिनी मुळे लागली.ती तिच्या शाळेच्या ग्रंथालयातून पुस्तके आणायची आणि ताई पुढच्या आठवड्यात वाचून दे हा...असे सांगत,मग मी वेळ मिळेल तस ते पुस्तक वाचून परत करी..बऱ्याच कादंबऱ्या वाचण्याचा योग तिच्यामुळे आयुष्यात आला. 2021 मध्ये FB वर कविता लिहिण्यास सुरुवात केली.चारोळीमंच या फेसबुक वरील समूहा तर्फे प्रकाशित झालेल्या "काव्यबंध" या काव्यसंग्रहा मध्ये माझ्या 7 कवितांचा समावेश आहे.."काव्यमिलन" हे काव्यसंग्रह देखील प्रकाशनाच्या वाटेवर आहे. चारोळ्या,कविता, हाइकु,ताँका,अलक,अष्टाक्षरी,शायरी हे काव्यप्रकार शिकले. काव्यमय प्रवास आजन्म सुरू राहावा ही इच्छा...

"मृत्युंजय" कादंबरी आणि "मी माझा" चारोळी संग्रह आवडती पुस्तके..मला आमची बोलीभाषा "आगरी" मधून कविता लिहिण्याची इच्छा आहे पण अजून तितकीशी बोलता येत नाही..समजून घ्यायचा प्रयत्न करते....अशी मी #शब्दांच्या_प्रेमात आहे सध्या,माझ ध्येय साध्य करण्यासाठी अणि असा माझा काव्य प्रवास...एखादे certificate मिळाले, कोणी लिखाणाचे कौतुक केले की पुन्हा पुन्हा आठवून आत्मिक समाधान देऊन जातो.

~ सौ. मोहिनी संजय डंगर

# दान शब्दांच



आजच्या या काव्यमालीका स्पर्धेचा विषय वाचला नि चार ओळी प्रसवल्या
त्यानेच या काव्य लेखाची सुरुवात करते...
"प्रवास आयुष्याचा असो वा भविष्याचा,
काव्याचा असो वा कलेचा,
तो ठरवून कधीच करायचा नसतो..
एखादा अपघात खूप काही शिकवून जातो,
तर एखादा क्षण आपल्या आत दडलेल्या स्व लाच ऊलगडून टाकतो"..

एखाद्या कवितेमध्ये यमक छंद जरी साधला गेला नसला तरी एक मुक्त छंद नक्कीच असतो..
व्यक्त आणि अव्यक्ताचा सांधा जोडण हेच तर कवितेचं काम असत न.. आणि तेच वैशिष्ट्य ही..
फक्तच उत्तम श्रवणीय, रंगरंगोटी केलेलं आणि ते केवळ नेत्रदीपक असून चालत नाही तर दर वेळी यमक जुळवण्यापेक्षाही आपल्या लेखणीतून आपलं जे म्हणन आहे ते करेक्ट कळत का वाचकांना हे फार महत्त्वाचं असत नाही का ??
माझा ही प्रवास काहीसा असाच आहे.
पण खरं सांगायचं झालं तर मी कोणी कवयित्री किंवा लेखिका ही नाही...लिखाणाची गोडी खूप स्वयंस्फुर्ती तुन आली का ?? तर तसही नाही...ती प्रेरणेतून आली..आता त्या प्रेरणा नेमक्या कोण आहेत ते पुढे मांडतेच मी..जे सुचलं, जे स्फुरल ते कुठे तरी जगजाहीर पणे मांडण्याचा हा माझा दुसराच प्रयत्न..आणि काव्यबंध समूह हे पहिलेच व्यासपीठ आहे..
पहिला प्रयत्न अर्थात बाप हे काव्य. ज्याला उत्कृष्ट कवितेचं मानांकन देण्याच्या पात्रतेच तुम्ही समजलात.. ही माझ्यासाठी खूप मोठी जमेची बाजू ठरली.. इथेच मला दहाहत्तीच बळ मिळालं..कारण याच धर्तीवर मी धाडस केलय आजच्या विषयावर लिहिण्याच.. त्यासाठी मी शतशः ऋणी राहील आपल्या काव्यबंध समूहातील सम्पूर्ण टीम ची..
या आधीच लिखाण हे केवळ स्वानंतसुखाय अस होत...
माझं नाव:- रोशनी फुलझेले गाव अकोला जिल्हा.. अर्थात वडिलांच गाव ते.. वडील हयात असेपर्यंत इयत्ता तिसरी पर्यन्त शिक्षण अकोला येथे झालं..थोडी समज यायच्या आतच ते आमच्यातून निघून गेले. वडिलांच्या जाण्याने तिथलं राहत हक्काचं घर ही सुटलं.. नन्तर च शिक्षण इयत्ता चौथी आणि पाचवी केळझर वरठी इथे माझ्या आजोळी झालंय..
आणि त्यानंतर इयत्ता सहावी पासून ते बाकी पूर्ण Graduation पर्यन्त च सम्पूर्ण शिक्षण यवतमाळ येथे झालं. म्हणजे Upbringing पूर्ण यवतमाळ मधेच.. कारण आई सोबत आहे..( म्हणजेच आता जन्मभूमी बरोबर कर्मभूमी सुद्धा यवतमाळ हीच आहे ) आणि finally माझ्या बालमनावर होणारे आघात थोडे का होईना पण कमी झाले..
जे उमलत्या वयात सतत जागा बद्दलण्यामुळे,सतत अवती भवती ची माणसं बदलण्यामुळे, माझी म्हणावीत अशी माणसं नेमकी कोणती आणि किती ह्या पडलेल्या गहन प्रश्नाने बालपण हरवलं.. परिस्थिती सोबत मनस्थिती बदलण्यामुळे व्हाचचे..
आणि तिथून सुरू झाला खरा संघर्ष..
पण त्या भयंकर अश्या संघर्षमय जीवनाची आता खूप सुंदर अशी कविता झालीये मित्रानो.. त्यासाठी नियतीचे सुद्धा आभार तिने मला खूप संघर्षप्रद आयुष्य दिल.. जो संघर्ष हवा असतोच प्रत्येकाला त्यानेच आपण तेजस्वी चमकतो कालांतराने.. ज्यामुळे मला जगण्याची खोली कळली..
कारण लांबी, रुंदी आणि उंची हे केवळ क्षेत्रफळाचे मापदंड नाहीयेत.. तर
लांबी म्हणजे - माणसाला लाभलेलं आयुष्य..
रुंदी म्हणजे त्याच जगणं आणि
खोली म्हणजे " त्याला सापडलेला जीवनाचा अर्थ "...
कारण माझा जन्म च मुळात अश्या घरात, अश्या घराण्यात झाला
जिथे संस्कारांची खाण आहे.. आणि संस्कार करणारे व्यक्ती किती तर केवळ एक आहे.. आई माझी...

आयुष्याचा शोध असो वा भविष्याचा वेध.. लेखन, वाचन हे आता माझ्या जगण्याचा, श्वासाचा एक महत्वाचा भाग झालंय.. आणि त्याची पहिली प्रेरणा च माझी आई आहे..तिनेच हाताला धरून लावली शिस्त वाचनापासून लिखाणाची.. त्यामूळे ती माझ्यासाठी एक चालत बोलत विद्यापीठ तर आहेच.सोबतच कार्यशाळा ही वाटते.. तिला वाचन प्रचंड आवडत..भौतिक सुखाच्या वस्तू घेण्यापेक्षा एक वर्षभरात किमान 10 तरी पुस्तक घ्यावीत आणि ती पूर्ण वाचून काढावीत हा अट्टहास असतो तिचा.. आणि तिच्यातून माझ्यात आलेल्या अनेक चांगल्या गुणांपैकी हा वाचनाचा थोडासा अंश आला असावा..

## माझा काव्यप्रवास

जो मला अगदी लहानपणापासून तर नाही पण इतक्यात 3 ते 4 वर्षात MPSC या स्पर्धा परीक्षेची तयारी करताना उराशी बाळगलेल एक हाडाचा अधिकारी होण्याची धडपड सुरू असताना उमगला..आणि तिथून हा प्रवास सुरू झालाय पण मी मघाशी म्हणाले तस तो फक्त स्वतःपुरता च मर्यादित होता आतापर्यंत..स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत असताना एक plan B ठरवलेला होता अर्थात अर्थार्जनाचा प्रश्न मिटवण्यासाठी त्यासाठी ही उपयोगी पडलं हे सहज पडत जाणार शब्दांच दान ज्यांनी मला मिळवून दिली भारतातील एका खूप मोठ्या नामांकित कंपणीत Director ची rank..

दुसरी प्रेरणा म्हणजे अभ्यास करताना इतिहासातील ते समाजसुधारक ज्याच्या त्यागाच्या आणि कार्यकर्तृत्वाच्या जोरावर आपण खूप सुखवस्तू आयुष्य जगतो..ज्यामुळे मी अंतर्बाह्य ढवळून निघाले .

त्याबरोबरच अवांतर वाचण्यात आलेली खूप सुंदर अशी पुस्तक..आणि अनेक कविता , काव्यसंग्रह ज्याने मला अनेक कोन मिळाले, दृष्टीकोन मिळाले..ज्यात अस जाणवलं मला की yes काहीतरी बोलायचं आहे , काहीतरी संवाद साधायचा आहे स्वतःशी...

आणि तो इथे येऊन थांबते की त्या परमोच्च क्षणाला जे जे सुचत, जे जे स्फुरत ते कागदावर उतरवाव ज्याने आतमध्ये अव्यक्त भावनांचं विष साठत नाही.. फार पटकन रीत (हलकं) व्हायला होत..

कारण खरच आपण एकमेकांशी जेव्हा संवाद साधतो तेव्हा आपल्याला जे जे वाटत ते खरच जस च्या तस इतरांशी बोलू शकतो का आपण ?? तर नाही बोलू शकत..कारण आपल्या आत्म्याला भीती असते ना आपण जे बोलणार आहोत ते समोरची व्यक्ती नेमकं कस घेणार, आपल्याला judge करेल का ?? आपण शब्दांमुळे माणसं गमावून बसू का ?? असे नानाविध प्रश्न मनात काहूर माजवतात आणि तिथून जन्म होतो लेखणीचा आणि माझ्या लिखाणा मागचा खरा उद्देश हाच की कुठलाही आडपडदा न ठेवता मला हवं तसं रीत होता यायला हवं तरच ते खर..

खूप कृतज्ञता आहे आपल्या
सर्वांप्रति..
आपले शुभाशीर्वाद असेच राहुद्या..
ही लेखणी कायम बहरत राहील जोवर श्वास आहे..

~ रोशनी लक्ष्मी सुंदरलाल फुलझेले



# प्रयत्नांती परमेश्वर



मी नगरपरिषदेत शाळेत नोकरी करायची. मुल इंजिनिअर मेडिकलला गेली.मला शिक्षणाची आवड असलेने मी मुक्त विद्यापीठला बी.ए. ला ॲडमिशन घेतले. बीएला असताना निबंध लेखनात पहिला नंबर मिळाला. महिला महोत्सव मध्ये मी माझ्या बुध्दीची चुणुक दाखविली. जनरल नॉलेज, खेळ, फॅशन शो स्पर्धा, गायन, नृत्य, मिसेस गृहिणी, उत्कृष्ट वेशभूषा, पारंपारिक दागिने, नगरपरिषद खेळ स्पर्धा इतर वेगवेगळ्या क्षेत्रात ५० पेक्षा जास्त प्राविण्य पारितोषके मिळवले. पण लिखाण आवडत असलेने एल. एस. जी. डी . व एल. जी. एस. केले. त्यामुळे नगरपरिषदेत महिला बालकल्याण समिती , शिक्षण समिती व बालवाडी या तीन विभागाची अधिकारी पदावर काम करण्याची संधी मिळाली. वेगवेगळे उपक्रम राबवून उत्कृष्ट प्रशासकिय सेवेचा दोन वेळा बहुमान मिळविला.

बालवाडी शिक्षिका असताना स्वतः गाणी रचून मुलांचे स्पर्धात बरेच नंबर मिळविले. मला पर्यटनाची आवड असलेने, मी प्रत्येक वर्षी भारत सहलीस किंवा परदेश टूरवर जायची. येताना पाहिलेले स्थळ वर्णन, माणसांचा स्वभाव, त्यांचे गुणदोष यांची छान कविता करायची. असे प्रत्येक वर्षी घडायचे. पण त्याचा संग्रह करायला कधी सुचलेच नाही.
३८ वर्ष सेवा करून रिटायर झाले. मला मोकळा वेळ मिळाला. मी लिखाण चालू केले. पण हवा तसा ग्रुप, हवी तशी साथ मिळाली नाही.

मी हायस्कूलचा मित्र मैत्रिणींचा ग्रुप बनविला .व १० वीच्या मुलांना, पालकांना मार्गदर्शन करुन त्यांच्या अडचणी सोडवू लागले. अनाथ आश्रमांना भेटी दिल्या .कोरोना महामारी मधे लॉक डाऊन सुरू झाले .आणि माझ्यातील कवी जागा झाला. मी लिखाणास सुरवात केली. मी प्रथम माझ्या गुरुजनांवर कविता केली.

मला चांगले साहित्य समूह भेटले. माझ्यातील दबलेल्या भावनांना साहित्य रूपात व्यक्त करण्याची संधी मिळाली. त्यांनी अनेक वेगवेगळ्या विषयांवर लिखाण करण्याची संधी दिली. अनेक काव्यप्रकार शिकणेची संधी मिळाली. अनेक स्पर्धामध्ये १००० च्या वर नंबर मिळविले. अनेक सहभाग सन्मानपत्र मिळाले.

मी आता भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच कोल्हापूर जिल्हा अध्यक्षा. पश्चिम महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा आहे . माझ्या समुहात मी अनेक काव्यप्रकार शिकविते . उपक्रम, स्पर्धा घेते .

काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. अनेक काव्य स्पर्धाची विजेती ठरले. काव्य संमेलनात सहभागी होते. अनेक राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले. अनेक बक्षिसे मिळाली.

मी संसारात लक्ष देता देता माझी सर्व आवड जपत आहे. माझे रिटायर नंतरचे आयुष्य खूप छान, समाधानी जात आहे.

म्हणतात ना प्रयत्नांती परमेश्वर. आज माझ्या काव्यप्रवासात मला यशाचे फळ मिळाले. माझ्या लिखाण साहित्यामुळे मला कवयित्रीचा मान मिळाला. आज समाजात मी अभिमानाने जगते आहे. अनेक पुरस्कारांने समाजात पुरस्कृत केले जात आहे .सर्व साहित्य समूह प्रमुखांचे मी मनस्वी आभार मानते.

धन्यवाद.

~ सौ . सुवर्णा पवार

# एक पत्र आपल्या जिवलगांसाठी



तिर्थ स्वरूप बाबास ,
साष्टांग दंडवत.

बाबा, आज तुम्ही वृदापणात अंथरूणावर झोपून आहात. बाबा उठाना, तुमचा लाडका मास्तर बोलतोय. तुम्ही बोलाल म्हणून मी हे पत्र लिहित आहे.

आज बाबा मला तुमचा गांवाकडचा भुतकाळ आठवतोय, दुस-याच्या शेतात नांगरणीसाठी बैलं घेऊन गेलात या एकाच कारणासाठी आजोबांनी तुम्हाला घराबाहेर काढले. पण ,मोडेन पण वाकणार नाही या उक्तीप्रमाणे संसाराचा गाडा आईच्या साथीने हाकत राहिलात. शेतात मोलमजुरी केलात ,घरगडी म्हणून ही काम केलात,ऊस तोडणी करायचंही काम केलात. आम्हाला मोठं करण्यासाठी वीटभट्टीवर ही कच्च्या विटाप्रमाने प्रमाणे भाजून निघालात. तुमच्या हाताला पडलेले घट्टे ही आज ही तुम्ही केलेल्या कामांची साक्ष देतात. हाडाच काड, रक्ताच पाणी करुन अशिक्षीत असून ही आम्हाला शिक्षीत केलात.

बाबा, तुम्ही आमच्यासाठी बरचसे सोसलात. शब्दात मांडण्याची माझी ताकत नाही. पण माझ्यातला कवी म्हणतो -

बाप माझा कधीच नव्हता,घराला ताप...
भोकं पडलेल्या बंडीच,त्यानं कधीच केले नाही मोजमाप...
घराचा कमी केला त्यांन संताप...
बाप माझा कणखर बाणा,
त्यानंच पिकवलं हि-या मोत्यांना
आणि ढेकळात झिजून घडवले आम्हा लेकरांना.

बाबा, आज ही एक प्रसंग आठवतोय, तुमची बैलगाडी होती. बैलं तर आधीच आजोबांनी काढून घेतली होती. राहील जीर्ण गाडी, तीचा लोखंडी कणा आठवण म्हणून तुम्ही ठेवला होता. मी त्यावेळी बारावी मध्ये शिकत होतो, परीक्षा फॉर्म भरायला ही दोनशे रुपये ही नव्हते तुमच्या कडे, तेंव्हा तो ही भंगारला विकून माझी परीक्षा फी भरलात. हे लिहिताना ही माझे हात थरथरत आहे, इतकंच काय बाबा, तुम्ही आमच्या पुढील शिक्षणासाठी दावणीला बांधलीलेली दूभती जनावरे ही विकलात. मला समाजाचा मास्तर केलात, खरच हे तुमचं ऋण पुनर्जन्म घेऊन ही फिटणार नाहीत. मला वि.वा.शिरवाडकरांची एक कणा नावाची कविता आठवते.. मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा...


पाठीवरती हात ठेवून नुसतं लढ म्हणा. खरच तुम्ही मृत्यूशय्येवर जरी असला तरी ही तुम्ही आमचा कणा आहात.

बरचसं काही लिहावं असं वाटतं, डोळ्यात आठवणीने गर्दी केलीय, कंदाचीत बरसतील.. ईश्वर चरणी एक मागणं आहे...बाबा तुम्हाला उदंड आयुष्य लाभो !!!

तुमचा लाडका सुपूत्र,
दत्ता मास्तर.

~ श्री दत्तात्रय नामदेव गुरव

# माझा काव्य प्रवास



माझे जीवनच आहे माझा काव्य प्रवास! जीवनातील घडामोडी माझे साध्य आणि मी साधक!

जीवनात होते बरेच काही बाधक वर्मी लागलेला घाव मनाला लागलेला चटका,
विरह कधी अत्यानंद, कधी पाहिलेला निसर्ग हेच तर विषय माझ्या कवितेचे, लेखनाचे.
मी हलाकीच्या परिस्थितीत कॉलेज शिकताना, जेव्हा पायात धड चप्पल मिळायचे नाहीत.
मोजकीच एक दोन कपडे बसला पैसे नाही म्हणून पायपीट करायची.

एकदा माझ्याकडून वेळेत फी भरली गेली नाही तेव्हा लेडीज रूम मध्ये फी न भरलेल्या मुलींची यादी लागली त्यात माझे नाव होते. प्रिन्सिपलना जाऊन भेटणे गरजेचे होते म्हणून गेले; जाताना गेले पण त्यांच्या केबिन मधून बाहेर आले वहीचे मागचे पान काढलं चार ओळी खरडल्या त्यातील एकच ओळ लक्षात आहे "गालावर अश्रू ओघळले" मैत्रिणीने वहीचे ते मागचे पान पाहिलं आणि म्हणाली कोण कवयित्री! वाटलं माझं काय चुकलं, पण नाही, काही लिहिता येतं हे सहज मला कळून आलं. तसेच कॉलेजमध्ये टिटोरियलला माझी सुखदुःख हा विषय दिला होता. मला २० पैकी १८ मार्क मिळाले होते आणि माझ्या सरांनी तर माझं कौतुक केलं होतं. काहीतरी लिहिण्याचं बळ माझ्या लेखणीत होतं हे मला कळून आलं काही वर्षानंतर ! मी माझ्या मैत्रिणीच्या घरी अभ्यासाला जायचे तिच्या मोठ्या बहिणीचे लग्न ठरलं होतं ती सतत गुणगुनायची एकदा माझ्या दुसऱ्या मैत्रिणींने म्हटलं ताई आता कुठे गुणगुणत नाही तेव्हा मी म्हटले ताईला आता सुर मिळाले मग कशाला गुणगुणेल ती! त्यावेळी नाही पण त्याचा अर्थ मला आता लागला की माझे साहित्यिक कवी मन कुठेतरी आत मध्ये दडलेलं होतं हे मला नंतर कळले.असे कितीतरी बोलून जायची.

लग्नानंतर मिस्टरांना पत्र लिहिताना शेर शायरी चार ओळी का असेना कविता लिहिल्याशिवाय पत्र पूर्ण व्हायचे नाही पत्रलेखन आता नामशेष होत चालले आहे हे वेगळे. नोकरी निमित्ताने पती बाहेरगावी असल्याने पत्राचा पसारा नेहमी असायचा मी आणि मुलं एकीकडे तर पती दुसरीकडे अशा अवस्थेत कवी मन कधी पोळायचं, कधी आनंदाने नाचायचं .लेखनीला धार येवू लागली.मी डी. एड. कॉलेजवर प्राध्यापिका आणि नंतर प्राचार्य अशा प्रवासात अनेक कविता लिहिल्या गेल्या.

मनात खूप कांही असायचं पण कुणाला सांगायचं अशावेळी माझा सांगाती सोबती कविता होती ती प्रामाणिकपणे मला रात्री ,अपरात्री साथ द्यायची झिरो बल्बच्या प्रकाशात सुद्धा कविता लिहिल्या गेल्या आणि लिहीतही आहे. माझे एक तर पुस्तक प्रकाशित व्हावे असं वाटायचं, मी नाही तर माझे सूतादी करतील असे म्हणून अशा सोडली होती.योग जमून आला.पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरवले पुस्तक तयार झाले पण करोन आडवा आला. माझ्या मिस्टरनी कवितेच्या पुस्तकाचे फक्त मुखपृष्ठ पाहिले. करोनाने माझे पती आणि माझ्या मुलीवर घाला घातला. त्यानंतर तीन वर्षांनी 30 एप्रिल 2023 रोजी माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले.अनेक पुस्तके होतील एवढी पुंजी माझ्याकडे आहे त्यामध्ये कविता कथा, ललित लेख, लेख इत्यादी.

असा हा माझा प्रवास चार ओळीने सुरू झाला आता माहित नाही माझ्या जीवनाच्या अंतापर्यंत अशीच लेखणी चालत राहावी कवितेने माझ्यावर आणि मी कवितेवर निर्मळ प्रेम करत रहावे. माझ्या अंतर्मनाच्या दर्पणात ते सतत चमकत राहावे अशीच ईश्वरचरणी प्रार्थना !

~ शालिनी सदाशिव पवार

# मन मोकळं जग दिसलं

मी श्री.मच्छिंद्र रत्नाकर झुरंगे, पुरंदर मधलं मुंजवडी माझं जन्म गाव.
घेते हृदयाचा ठाव. मन मोकळं होतं मंग वेदना हलक्या होतात रावं.

सुंदर विचारांचा कल्पवृक्ष तयार करून वाटण्यात येते खूप मज्जा.
माझी कविता म्हणते मला मी तुझी राणी तु माझा राजा
श्वास होतो ताजा,होतो खूप गाजावाजा.
आनंद होतो खूप मनाला.
मनातील विचार दाबून न ठेवता सांगावे सर्वजणाला.



मी आचार्य अत्र्यांच्या भुमीतला थोडी विनोदाची झालर लाभलेला
जे दिसतं ते प्रकट करण्यात आनंद मानलेला.
वास्तवाचं भान ठेवून परिस्थितीचा मान राखणारा
प्रामाणिक प्रयत्न करणारा साधं राहणीमान आणि
छान विचार करून गावचा साधा सरळ माणूस म्हणून
जगण्यातून काव्य निर्माण करणारा मी.मच्छिंद्र रत्नाकर झुरंगे.

पहिली कविता माझी स्वार्थ
पुर्वी होता परमार्थ आता आला स्वार्थ.
काय याचा अर्थ, होतो का सिद्धार्थ.
मी म्हणजे सर्व, असा होतो गर्व.
एका क्षणात संपून जातं पर्व.

दुसरी कविता माझी कॉलेज, तिथे शिकणाऱ्याला असावं लागतं नॉलेज.
खायला नसले काही, तरीही नखरं करण्यातचं सारा टाईम जाई.
माझ्या कविता वास्तव मांडणारया बाटली, बेवडा,पती, नवरा,पद , वास्तव, माणूस, ज्वलंत सत्य, जीवन,डिंच्याक,भुलभुलैया राजकारण, तुकडे,भामटा, चिमटा आणि अशा अनेक कविता लिहिल्या काही सादर केल्या आदर ठेवून.छंद जिवा लागला. मनमोकळा झाला.रोज काही ना काही लिहिण्यात वेळ आनंदात चालला.

सुर्यात आग आहे. चँद्रात दाग आहे.
अंतर्मनात जी जाग आहे. तो सुंदर काव्याचा भाग आहे.
लिहिल तेवढं कमी आहे. म्हणून शेवटी जाता जाता
झाडाचा पेन केला. सागराची शाई केली.
आकाशाचा कागद केला. कवितेच्या समर्पणासाठी छंद जिवा जडला.
बॅटिला चेंडू लागला. काव्यमय होऊन जिव जिंकला. प्रवास कवितेचा थोडक्यात मांडला.

सर्व साहित्यीकास माझा मानाचा मुजरा.शब्द थांबत नाहीत तरीपण माझ्या विचारांना पुर्ण विराम देतो. धन्यवाद मनापासून

~ श्री. मच्छिंद्र रत्नाकर झुरंगे

# माझा काव्यप्रवास

आज खूप जाणवलेय मला
दूर मागे वळून पाहताना
साठी येईपर्यंत तरी बरं का
कवितेचा आणि माझा ,
मार्ग तसा समांतरच  होता

निवृत्तीच्या वळणावरती,
दोघींची ओळख झाली
दोघींमध्ये गणित आले
आणि जगावेगळे घडले

आयुष्यातील भूमिती नामें
कवितांचे एक पुस्तक झाले
कवितेचे-माझे नाते घट्ट झाले
दोघींनी बरेच टप्पे पार केले

झकास जमली त्यांची यारी
शब्द, अर्थ फिरती भिरीभिरी
विचारांच्या शेतात काव्यांची
पेरणी कशी झोकात झाली

गर्दी व्याकरणाच्या अलंकारांची
कधी भजन, कधी भक्तीगीत
त्यांच्या बरोबर आले प्रेमगीत
अभंग,पोवाडा,जोगवा,बालगीत

हास्य नी लावणी आले संगती
काव्य व दीर्घकाव्यासवे चारोळी
बालगीत आणि  चित्रकाव्यही
विषय नवीन, भावना मनातली

ताळमेळ पण जमला भारी
शब्द, अर्थ  फिरती भिरीभिरी
विचारांच्या शेतात काव्याची
लेकरे ही माझी खेळती सभोवती

आनंदे व्यतीत माझी  निवृत्ती
आम्ही  सारे  ऋणी  अ◌ॅडमिनचे
व्हॉट्सॅपचे अन्  या मोबाईलचे
पुढची वाट अगदी स्वच्छ आहे

आकाशही वरती अनंत आहे
आकाशही वरती अनंत आहे



~   अर्चना कुलकर्णी

# माझ्ा काव्यप्रवास

माझा काव्य प्रवास
अतिशय सुखद आयुष्याचा
लेखणीचा छंद जोपासून
मान वाढवितो साहित्याचा....१

लेखणी चाले माझी जेव्हा
निरनिराळ्या विषयावर जशी
नव नवी कविता लेख चारोळी
कागदावर अवतरे तशी......२

कधी लेखणी दाखविती
सौन्दर्य त्या देखण्या निसर्गाचे
तर कधी लेखणी विचार मांडी
सुख दुःखा बाबत जीवनाचे.....३

विविध विषयावर आजवर
लेखणी माझी लिहीत गेली
मला माझ्या लेखणीतून
जीवनाची खरी व्यथा समजली...४


विचारांचे थैमान असता डोक्यात
एकांतात जाऊनी बसतो
आठवूनी जुन्या त्या आठवणी
लिहुनी विचारांची समजूत घालतो...५

संतांचे अभंग लिहितांना
साक्षात ते सामोरी दिसतात
आशीर्वाद रुपी त्या कल्पनेने
अस्तित्वाचे दर्शन घडवितात...६

पारितोषिके सन्मानपत्र मिळाले
मिळाला तो खूप बहुमान
माझ्या लेखणीच्या कर्तृत्वावर
साहित्याने दिला तोची सन्मान...७

लेखणी मुळे विविध ठिकाणी
कवी संमेलने ती ठरली
कविता सादरीकरण करून
नव सारस्वतांची ओळख पटली....८

अखिल भारतीय साहित्य सम्मेलन९६
बापू च्या नगरीत वर्धेत ठरले
स्वालिखित अभंग सादर करुनी
आयुष्याचे खऱ्या अर्थाने सार्थक घडले...९



~ मुकेश मुकिंद

# माझा काव्यप्रवास

काव्य प्रवासाच्या आठवणी
दाटून आल्या भावना अंतरीं
काव्यबंध समूहांमध्ये
उतरविते शब्दांच्या सरी

बालपणीच्या वयात
होती वाचनाची ओढ
परि कधी शब्दांना नाही
दिली लिखाणाची जोड

कॉलेजच्या मासिकात
गेले होते भाव खाऊन
दोन तीन कविता,लेख
तेव्हा आले होते छापून

नंतर राज्यस्तरीय स्पर्धेत
माझा निबंध आला पहिला
तेव्हा आनंदाला माझ्या
पारावर नाही राहीला

लग्नानंतर सारे शब्द
व्यापात विरुन गेले
शब्दरूपी सुमनांना
नाही फुलविता आले

आयुष्याच्या या टप्प्यावर
सखीने प्रोत्साहन दिले
चारोळीने केली सुरुवात
प्रथम क्रमांकाने हर्षून गेले

शब्दांना शब्द जोडता गेले
कवितेला आला आकार
काव्यबंध समुहामुळे मिळाला
सर्वोत्कृष्ट मानांकनाचा षटकार

शब्दांचा झाला सुरू बहर
चारोळी, आठोळी, अभंग
अलक आणि कवितेतील
मर्म पाहून होऊन गेले दंग

भावनांना पानावर
उतरविता  होतो आनंद
कवितेच्या रूपाने समुहाचे
वाढत गेले ऋणानुबंध

वयाच्या उतरत्या टप्प्यावर
मनमोकळ्या करण्या भावना
समुहांच्या उपक्रमाने दिली
आयुष्याला नवी चालना



~ सौं. संगिता अभंग

# काव्यछंद

शब्दांशी झाली मैत्री
नकळत कविता सुचली
शाळेतुन प्रारंभ झाला
`कारगीलचे युद्ध पेटले.
8वीत असताना प्रथम लिहली वाटलं ही नव्हतं ती,
कव्हर पेजची शान ठरली ..
आनंदले खूप, छंद म्हणून जोपासली.
साहित्याचा अनुभव नसतानाही
सत्यभावना, व्यथा अन् वेदना
पानोपानी उतरविल्या , बोलक्या केल्या.
मनातील घुसमट थांबली ,एक ऊर्जा चेतली
उरी असलेली तळमळ, प्रसंगी चीडही मांडली.
कॉलेजमधयेही या प्रवाहाचा उत्साह थांबेना.
‘रामदास फुटाणे’ यांच्याकडून सन्मान लाभला.
काव्यसंमेलन, काव्य मैफिलीत
सहभागी झाल्या कवी मनाच्या संवेदना...
तेव्हा कुठे कळली कवीता काय असते.
ती कशी सादर करतात.
गायनातुनही ती व्यक्त होते.
कधी नव्हे ते पोवाडा ही गायला
करवीर नगरीत शाहीरा मान मिळविला

.
नंबर अन् पुरस्काराची ना धरली आस
समाधान आणी दुसऱ्याच्या चेहऱ्यावरील हास्य
हेच माझ्या लेखनाचे श्रेय.
लग्नानंतर ही प्रवास चालू राहिला...
संदेश ,चारोळी लिहुन नंबर ही पटकवला.
एकपात्री नाटकातून सत्य कथन केले.
कमळा व्यक्तीरेखा, अन् कुंकू-टिकली.विनोदी नाटक साकारले.
मनात होते साचले,साठले कवीतेतुन बाहेर पडले...
एक हक्काचं पान भेटलं, मन हलक झालं.
लोकमत ,सकाळ ने ही वेगळी दखल घेतली.
कवितेला जागा दिली.
पटेल,आवडो अथवा न आवडो
मांडत गेले,लिहित गेले,धाडस आले..
जगण्याचे चढ उतार अन् संघर्ष
शिकवतो सारे काही अन् साधतो उत्कर्ष.
जमतंय थोडं ,सोडली नाही आस
प्रयत्न अजुन चालू आहेत...
शब्दांचे सामर्थ्य खुप आहे महान
ज्यांनी भागवली माझी तहान
`कवियत्री’ बनण्याचा दिला मला मान
असा आहे माझा काव्य प्रवास छान....



~ सौ. रेखा सुर्यकांत कांबळे

# शब्दफुले

रुग्णसेवा हीच ईशसेवा
मानुनी जाहले डॉक्टर
प्राण रुग्णांचे वाचवुनी
दिले नाही त्यांना अंतर..१

माझा सारा जीवनप्रवास
रूळला होता रूग्णालयात
साहित्याचा गंध नव्हता
व्यस्त डॉक्टरी जीवनात..२

मराठीची आवड होती
लिहायला नव्हता वेळ
निवृत्तीनंतर मात्र माझा
सखी कावितेशी जमे मेळ..३

साहित्याच्या प्रांगणात
सहज केला मी विहार
शब्दफुलांचा बहर येता
कविता झाली साकार....४

काय झाले मला कळेना
शब्दांना फुटला पाझर
लेखणीतून उतरले शब्द
पानावर येती झरझर.....५

शब्द फुलांनी तिथल्या
पाडली मजला भुरळ
फुलांच्या त्या सुगंधाने
सरे मनीची मरगळ......६

कवितेच्या गावी जाता
फुले शब्दवेल अंगणात
सडा काव्य सुमनांचा
कवितेच्या दरबारात..७

बहुरंगी काव्यफुले
पसरली ही चौफेर
अष्टाक्षरी, षडाक्षरी
अभंगांनी धरला फेर..८

कवितेच्या गावामध्ये
ओवी,गझल,भारूड
गेली रंगून मी तयात
घाली मनाला गारूड..९

कवितेच्या प्रांगणातल्या
दरवळीने मन सुगंधित
काव्यातील शब्दफुलांनी
केले मजला संमोहित...१०

विविध शब्दफुलांनी
भरली माझी ओंजळ
कवितेत शब्द गुंफताना
मन निर्मळ, प्रांजळ..११

कवितेच्या दरबारात
मिळाले मान,पुरस्कार
स्वांत सुखाय लिहिले
काव्याने आणली बहार..१२

शब्दमोत्यांनी गुंफली
कवितारुपी वळेसर
शब्दातित अर्थ जणू
शब्द शब्द ज्ञानेश्वर.....१३

कवितेच्या ह्या प्रवासात
नूरे चिंता,क्लेश,ताण
नाते शब्दाक्षरांशी जोडता
फेडले शारदेचे वाण..१४

आयुष्याच्या सांजवेळी
सखी माझी जणू कविता
आयुष्याच्या अंतापर्यंत मी
असावी तिची तपस्विता..१५

कवितेच्या गुंफणीत
अर्थपूर्ण शब्दसंस्कार
चित्त झाले मग प्रसन्न
शब्दब्रम्हास नमस्कार...१६

वळून बघता प्रवास
वाटे मजला कृतार्थ
साहित्यिकांच्या संगतीत
उमगला मज जीवनार्थ..१७



~ डॉ. दक्षा पंडित

# काव्यमय विश्व

नेहमीच असते साधी राहणी
माझे काव्यमय विश्व आगळे
चिंतनातून ही काव्य निर्मिती
सुप्त भावनेचे अविष्कार सगळे...(१)

बालपणापासूनच सुप्त इच्छा
दररोज असे काहीतरी लिहावे
व्हाव्यात समाज भावना प्रकट
रसिक हृदयात स्थान मिळावे...(२)

दैनंदिन जीवनात मिळाला वेळ
तशी माझी चालत होती लेखणी
चिंतन,मनन सर्वांशी संवादातून
मांडावी काही समाजाची दुखणी...(३)

विविध उपक्रम,स्पर्धा हीच संधी
त्यातून विषयावर करावे लिखाण
चारोळी आणि विविध काव्य प्रकार
मन मोकळे करण्याचे एक ठिकाण...(४)

चालत गेली माझ्या शब्दांची जादू
वाढत चालला कवितांचा साठा
सेवाभाव जागृत असावा नेहमी
येऊ नये कधी मला गर्वाचा ताठा...(५)

नियमितपणा हवा जीवनात
आरोग्य राहील सदा निरामय
एकच स्वप्न उराशी बाळगले
माझे विश्व हे निरंतर काव्यमय...(६)

असा माझा काव्य प्रवास जणू
काव्य रसिकांसाठी एक पर्वणी
जणू ठरतोय माझा काव्य प्रवास
जो भेटतो तो आवर्जून म्हणतोय
असाच कायम ठेवा आत्मविश्वास...(७)



~ अरविंद कुळकर्णी

# माझा काव्य प्रवास

कविता माझ्या डोक्यात
कधी अन कशी शिरली ।
कुठली कविता कधी लिहिली
अन् पहिली कविता कधी स्फुरली ॥

मन भावनांना वाचत होतं
लिहित गेलो जे सुचत होतं ।
कविता वाचून वेडं मनही
आनंदाने नाचत होतं ॥

शब्दाला शब्द मिळत गेले
सहज यमक जुळत गेले ।
तिथूनच मला कविता करण्याचे
नवीन संकेत मिळत गेले ॥

पण मला कविता विश्वातील
जाणकार कुणीही भेटत नव्हतं ।
कविता रसिकांच्या मनात उतरेल
असं मलाही वाटत नव्हतं ॥

एक दिवस सहजच मला
काव्यरसिक हा ग्रुप भेटला
चारोळ्या लिहिणे सुरू झाले
अन प्रमाणपत्र हा प्रुफ वाटला

माझ्या चारोळ्या फुलत असतांना
समूह मिळाला काव्यबंध ।
नाळ कविता उत्कृष्ट आली
वाढत गेले ऋणानुबंध ॥

अनेक ग्रुप अनेक कविता
भावविश्व वाढत गेले ।
माझा कविता प्रवास नावाचे
घोडे वाट काढत गेले ॥

नवे विषय नव्या कल्पना
नवे रंग चढत गेले ।
नव्या कविता नवीन रस्ते
नसिब वाट काढत गेले ॥



~ ज्ञानदेव लक्ष्मणराव डिघुळे

# माझा काव्य प्रवास

बालपणीच भाव भरल्या शब्दांनी
मैत्री केली माझ्याशी
संगतीने त्यांच्याच
प्रीत जुळली काव्याशी

आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर
मार्ग गवसला हिरकणी समूहाचा
सुरू झाला आनंदमय प्रवास
जीवन व काव्यछंदाचा

नंतर साकव्य
व इतर समूहांची संधी आली
काव्यबंध समूहाणे तर
माझी आनंदवेल गगनास नेली

अष्टाक्षरी ,षडाक्षरी ,
नित्य नाविन्याचा आनंद
अभंग ,ऑनलाइन स्पर्धा
भहरला काव्यछंद

ऑडिओ, व्हिडिओ चित्र चारोळी
उपक्रम नित्य नवा
मनसोक्त उपभोगते
आनंदाचा ठेवा

अविस्मरणीय आनंद हा
शेवटच्या क्षणीही आठवत राहील
आठवणींच्या संगतीने या
मृत्यूही माझा आनंदमय होईल

शब्दरूपाने भावनेला
व्यक्त करत राहते
अबोलच मी जरी
मनमोकळे होते

स्पष्ट मांडल्या भावना जरी
दुखत नाही मन कुणाचं
काव्यरूप घेता क्रोध ही
रूप घेतो मवाळकीचं

ईश्वराने दिली अनमोल कला
भाव मनीचे सांडण्या
सुखदु:ख अंतरीचे
न लागे कोण सांगण्या

संधी दिली समूहांनी
बहर कल्पनेस आला
हितचिंतक मित्र-मैत्रिणीनी
आत्मविश्वास वाढवला

काव्य प्रवासास माझ्या
योग्य दिशा कित्येकांनी दिली
सर्वांवरती आभार सुमने
नाही उधळता आली



~ सौ भारती राजेंद्र बागल

# माझा काव्य प्रवास

प्रवास काव्याचा सुरु कधी झाला
मलाही त्याचा बोध न झाला
शाळेत जाऊन अ आ ई शिकले
धडे सगळे वाचू लागले
हाती माझ्या लेखणी आली
वक्तृत्वाची कला अवगत झाली
शब्दाशी मी खेळू लागले
शब्द शब्द जोडुनी अर्थ तयार झाले
वाचनाची आवड निर्माण झाली
वक्तृत्वासाठी लेखणी धारधार झाली
संवेनशील मनावर अनेक आघात झाले
माईतात्याच्या संघर्षाने मन हेलावूनी गेले
किती कष्ट त्यानी स्त्रीशिक्षणासाठी केले
एकपात्री प्रयोगातून मी सादरीकरण केले
किशोरवयीन वयातच मन प्रगल्भ झाले
कॉलेजच्या जीवनातही ते वैचारीक राहिले
असा माझा काव्यप्रवास सुरु झाला
शालेय जीवनातच पाया रचला
आता इमारत तयार झाली
विविध पुरस्कार, संमेलन अन्
व्याख्यानाने त्याची रंगरंगोटी केली
अजूनही शिखर गाठायचे आहे
धारदार लेखणीने मला सारे
अन्यायाविरुध्दचे रान पेटवायचे आहे
शुभेच्छा तुमच्या नक्कीच असतील
काव्यप्रवासात मैलाचा दगड ठरतील



~ डॉ. वैशाली कमलेश शेंडगे

# ||काव्यप्रतिभा||

कवितांची दुनिया वेगळीच आहे
प्रत्येक विचार तो त्यात येऊ पाहे

कविता करते सर्वांचे दर्शन
लिहिण्यातून तिच्या कळते ते वर्णन

कविता कवींची असे ती स्वतःची
मनातील विचारांची गुंफण फुलांची

कविता देणे ते त्या कृपावंताचे
शब्दांची जडणघडण संस्कार जयाचे

जगण्याची उमेद नकोच तो खेद खरा
निर्झर तो झरा स्वच्छंदी पाखरा

मनातील घालमेल उठेल कोलाहल
काव्यस्पंदनाने शितल मन होईल निर्मळ

नवा सुर गवसे आनंद तो वसे
गाता गाता तुला स्वरूप ते गवसे

सापडे सद्विचारांचे बळ पुन्हा नव्याने
एक एक शब्द भेटता काव्य उमलन्याने

ऋण तयांचे मजवरी होई मोकळा श्वास
विचलित मनास मिळे खरा तो ध्यास

काव्य लहरी संगे घडो सफर अंतरीची
काव्यप्रतिभा उंचावी सदा ती मनीची

शब्द फुलांची ओंजळ करते आता अर्पण
काव्य प्रवास हा तुम्हा समर्पण तुम्हा समर्पण..



~ छाया प्रवीण नाळे भुजबळ

# माझा काव्य प्रवास

होते मी आठवीत शिकत
कवीता करण्याची लहर आली
माहित नव्हते यमक टमक
तरीपण कवीता मी लिहीली..

सांगायचं आच्छर्य म्हणजे
दिवाळी अंकास होती दिली
दोन रूपयेचे मानधन म्हणून
पोष्टमनने मनी ऑर्डर  दिली....

छोट्या छोट्या होत्या मुली
दिवाळीचा फराळ करित
त्यावरून सुचत मज गेली
खूपच झाले मी आनंदित...

चंगु मंगु बालकवीता
सुरू झाला कवितेचा प्रवास
सर्वांनी माझे खूप कौतुक केले
उत्साह येऊ लागला मनास....

लग्नानंतर थोडा खंड पडला
पुन्हा स्फुर्ती देवता स्फुरू लागली
सकाळ, स्वराज्य मधून लेख कवीता
पुन्हा प्रसिद्धीस सुरुवात झाली...

पूर्वी लग्नाच्या मंगलाष्टका करीत
माझ्या मुलीच्या इतरांच्याही लग्नात
मी मंगलाष्टका करू लागले
भाचे माझे होते गायक ते म्हणत...

हल्ली व्हॉट्स ऑप गृप वर
रोज नवा विषय नवा प्रकार देत
त्यामुळे चांगलीच आवड लागली
रोजची सन्मान पत्रेही मिळू लागत...

काव्य बंध समुहात तर
स्पर्धा होत असतात सतत
त्यामुळे उत्साह खूप वाटतो
भाग घेताना आनंद  वाटत...



~ वीणा पाटील

# नव्याने ऋतू बहरताना

नमस्कार,
मी रुपाली देव हंबर्डे.
शब्दांमुळे आपली ओळख झालेलीच आहे.
अजून माझी ओळख मी काय करून देऊ ?

शब्दांमुळे नवी ओळख मिळाली
प्राजक्तगंधापरी मी दरवळली
शब्द सख्या तुझ्यामुळे हे सारे घडले
आणि माझे आयुष्य बहरले.

जीवनात अनेक चढउतार येतात
काही अनपेक्षित घटना घडतात
पण शब्दांची फुंकर हळूवार मिळते
नी गोष्टी साऱ्या क्षणात सावरतात.

तसेच काहीसे माझ्याही आयुष्यात घडले.

"जीवनपथावर चालताना कधी उन्हाची काहीली,
तर कधी गुलमोहरी सावली लाभली,
कधीं ठेच लावणारी तर कधी
स्नेहाने सावरणारी नाती गवसली."

कधीं भावनिक , शारीरीक वेदना ,
तर कधी चंदनी शितल फुंकर मिळाली,
परंतु अंगिकारला मी
सकारात्मक दृटिकोनातून बघण्याचा ध्यास,
नवीन ऋजुवात नवी आस.

नकळत काव्याशी मैत्री झाली
आणि वाटले ,

अंतरातले सल आणि वेदना
शिशिरामध्ये सरून जातील
नवा बहर शब्दांना येऊन
काव्य सुमने दरवळत राहतील

कविता बहुतेक तेव्हापासूनच माझ्या मनात रुजलीय. आजही मी अनेकदा त्यांच्या कविता म्हणते आणि ओघाने माझ्या लेकीलाही आता त्यांची ओळख होऊन आवड निर्माण झालीय. या धकाधकीच्या, अनिश्चिततेच्या आयुष्यात
कविता म्हणजे जणू वाळवंटातील ओॲसीस आहे असे मला वाटते.

मन उदास असेल ,निराश वाटत असेल तर सहज गुणगुणावी कविता आपल्या आवडीची ,आणि समजवावे स्वतःलाच की "आनंदी आनन्द गडे जिकडे तिकडे चोहीकडे " प्रसन्न वाटेल अगदी , आणि हलकेच एक उमेद जागृत होईल.
आता च्या काळात आपल्या सर्वांना या आशेची, या उमेदीची नितांत गरज आहे, हो ना.

मुळात मी निसर्गप्रेमी, प्राणी पक्षी याच्याबद्दल माया असलेली. एकदा आम्ही कोकणात गेलो होतो सहली साठी, त्यावेळी मी पहिल्यांदा ईतका सुंदर निसर्गसौंदर्य जवळून पाहिले.मला खूप भावला कोकणचा समुद्र किनारा , माडांची बाग, आणि हिरवं लेणे ल्यायलेली धरा. माझ्या पहिल्या निसर्ग कवितेचा जन्म कोकणातला आहे. काळानुसार पुढें जात असताना माझा वाचन प्रवास आणि आवडीनुसार चारोळी लेखन चालूच होते. स्वामी, मृत्युंजय छावा यांचे वाचन तर सातवी आठवीत असतानाच झाले होते.

यथावकाश मी इंजिनीयर झाले. पुढे लग्नानंतर मात्र सासरी जाच झाला खूप. संघर्ष करावा लागला. काव्याची ओढ मनातच दबून राहिली.

मोठे मोठे अडथळे आले तर नदी आपला प्रवाह जरा बदलून किंवा मार्गात आलेल्या शिळेला दुभंगून पुढे जात ,आपले प्रवाहीपण अबाधित ठेवते स्त्री चे जीवन सुध्दा नदिसारखे प्रवाही आहे. संसारात येणारे अडथळे पार करत प्रसंगी नमते घेत तर कधी कठीण कठोर होऊन जीवन प्रवाह सुकर करते.

मी पण तोच प्रयत्न ठेवला. काहीं वेळा हताश झाले की श्रीकृष्णाला आळवायचे मी . त्याच्यावर अत्यंत श्रद्धा असल्याने तो मार्ग सुकर करेन ही खात्री होती. यात माझा वाचन लेखन प्रवास मागेच राहिला.

पण बाबांनी प्रोत्साहन दिले, शब्दांशी पुनः मैत्र जुळले. मनातले सल वेदना अक्षरातून उतरत गेल्या. लेकीमुळे तिच्या निरागस प्रेमामुळे नवें सुर गवसत होतें. माझ्या आयुष्यात तिच्या प्रेमाचे रंग भरल्या जातं होते.

# माझा काव्यप्रवास

माझं जीवन जणू,
ऊन सावल्या येती जाती, वाट पुढे मी चालत राहते
तप्त उन्हाच्या झळा सोसुनी, हिरव्या सावलीची वाट पाहते!
ग्रीष्मात उष्ण असे दाह, मार्गात पोळले पाऊल होईल
नसतील मिळाल्या गर्द सावल्या, मी गुलमोहर होऊन सावली देईल.
असे झाले होतें.

परंतु हाय बीपी , अँजिओग्राफी तसेच इतर काहीना काही हेल्थ ईशू चालूच होते. पण दुरूनही बाबांची खंबीर साथ होती मला. आणि अचानक तो फादर्स डे आला . एक अविस्मणीय फादर्स डे.
माझ्या वैयक्तिक जीवनातल्या संघर्षामुळे बाबांना हार्ट अटॅक येऊन बायपास पण झालेली होती. फादर्स डे होता, त्याच दिवशी मी माझ्या बाबांना गमावून बसले. खूप मोठा धक्का होता हा.
माझा आधार गेला होता. मग मात्र मन खंबीर कसे करावे याचा विचार करायला लागले. आणि शब्दप्रवास पुनः एकदा चालू झाला.
एकाकी वाटेवर जणू जुना सोबती पुनः भेटला.
मी एकाकी झाले. मगं भेट झाली प्राजक्ताशी.
ज्याने मला बालपणी आनंद दिला होता, निर्व्याज स्नेह देऊन, वेदना सहन करूनही जो अखंड दरवळतो तो प्राजक्त सखा .
जणु मला सांगत होता मी आहेच तुझ्यासोबत प्रत्येक वळणावर,तू विसरलीस का मला.पण मी आहेच. तुझ्या शब्दातून बहरण्यासाठी तुझें आयुष्य गंधाळून टाकण्यासाठी आतुर.
तुझीच वाट बघत होतो सखे.
मीही स्मित करून त्याला होकार दिला. एका नव्या काव्यप्रवासाची वाटचाल चालू झाली . बाबांच्या आठवणीत पुनः धरलेली लेखणी मग सखीच झाली माझी. त्याचवेळी अक्षरधन आणि इतर काहीं प्लॅटफॉर्म वर मी लिहायला लागले. मी लिहिलेल्या रचनांना छान अभिप्राय आले.माझा उत्साह वाढला. इतके वर्ष मनात साठलेले आभाळ रीते होत होते.आणि इंद्रधनूचे नवनवे रंग लाभले.शब्दातून मीच मला उलगडत गेले. एकदा मैत्रिणीने मला मॉम्सप्रेसो बद्दल सांगीतले . आता मला जणु अल्लाउद्दीन चा खजिना गवसला असा आनंद झाला. माझ्या लेखणीला दाद मिळत गेली काव्यातून. माझा शब्द प्राजक्तगंध दरवळत होता. माझे अस्तित्व जे मी विसरले होते त्याची मला जाणीव झाली. अशातच माझी मोठी क्रिटिकल सर्जरी झाली. त्यातून सावरायला मला माझ्या लेखणीने मदत केली. शारीरिक मानसिक वेदना, दाह यावर हळुवार चंदनी फुंकर घातली. माझ्या कविता आणि लेखनाला बहर आला. बाबांना आदरांजली म्हणून मी काव्यसंग्रह प्रकाशित करावा असे वाटले. त्यासाठी तयारी चालू केली.
पण नियती च्या मनातले कुणाला ओळखता येते.
पहिल्या सर्जरीला जेमतेम दीड वर्ष झाले तोच पुनः सर्जरीला सामोरे जावे लागले . आयुष्यात चढ उतार येतात,कधी निसरडे वळण सुध्दा येते.पण डगमगून न जाता हिम्मत ठेवून , सकारात्मक दृष्टीकोन ठेवून , त्याच्यावर विश्वास ठेवून वाटचाल करायला हवी.
नव्याने फुलताना काव्य फुलायला लागले आणि माझा पहिला काव्यसंग्रह ऋतू बहरताना प्रकाशित झाला .

संस्कार भारतीच्या सौजन्याने प्रसिद्ध श्री अनिल आठलेकर सरांच्या हस्ते प्रकाशन होऊन पाठीवर कौतुकाची थाप मिळाली .

तिमिरातून प्रकाशवाट मिळते,अंधाराच्या गर्भातून नवी पहाट गवसते
विश्वास माझा सदा निरंतर अंतरीच्या गाभारी आशेची ज्योत अखंड तेवते.

तीमिराच्या रात्रीनंतर नवी पहाट नक्कीच येत असते. तेच झाले. लिहिता लिहिता काही ई मॅगझिन आणि अजून काही प्लॅटफॉर्म वर लिहित गेले. अक्षरधन, इरा ब्लॉगिंग, शब्दशिल्प, चारोळी मंच , अश्या नावाजलेल्या साईटस वर लिहिती झाले. मला कवयित्री म्हणून ओळख लाभली. वाचकांचे भरभरून कौतुक आणि स्नेह लाभतोय यात माझा आनंद सामावला आहे. माझी खरी ओळख मला माझ्या कवितेने दिली,मी कवितेच्या अखंड ऋणात आहे .
मी अशी, मी तशी,खरच मीं स्वतःला विसरले होते मी नक्की कशी. जीवनाचा रस्ता पार करताना वाटेत कधी खाचखळगे कधी धरपडले कधी मज खरचटले..
आत्मविश्वासाने माझी मींच परत वाट धरली . त्या वाटेवर चालताना कधी दुःख तर कधी सुख उन सावलीचा हा खेळ पण अश्याही मनस्थिती स्वतःला गतिमान ठेवलंच कधी शिशिर कधी वसंताचे सौख्य लाभले.....
जीवनाच्या प्रथावर प्राजक्ताने सडे शिंपिले, प्रत्येकांची मने जपताना मी स्वतःला विसरून गेले . शब्दांशी माझी मैत्री झाली, हरवलेली मीं नव्याने मला परत मिळाली माझी ओळख आता कवयित्री म्हणून झाली.
लिहिता लिहिता.. मीच मला नव्याने गवसले....... आता मी अशी, शब्दप्राजक्त होऊन दरवळणारी सखी.
पानगळ सरून सये, येई बहर वसंताचा
ऋतू बहरताना पुनः, गंध दरवळे प्राजक्ताचा!
शब्दातून व्यक्त होताना, अंतरीचे भाव उलगडले
पारिजात झाले काव्य, शब्दसुमने दरवळले !!
हरवले होते अस्तित्वाचे, क्षण गांधाळून बहरले
नव्याने ऋतू बहरताना, माझी मलाच मी गवसले.
तर असा आहे माझा आता पर्यंतचा काव्य प्रवास, खर तर ही एक सुरूवात आहे. या काव्यप्रवासात माझ्या शब्दांना प्राजक्त होऊन निरंतर दरवळायचे आहे. यामध्ये नविन सोबती आणि त्यांचां स्नेह असाच लाभावा हीच इच्छा.



~ रुपाली देव हंबर्डे

# माझा काव्यप्रवास

साहित्यात मलाच मी
वाटायचे लहान....
सुचायचा तो एकेक शब्द
वाटायचा महान...

सहज व्यक्त होता
घडत जायची कविता...
लेखन प्रेरणा देत रहायचे
माझे प्रेमळ पिता....

मनातील भावनांना वाट
काढून द्यायचे....
स्वरचित चारोळी तून
व्यक्त होत रहायचे....

जगण्यातील दु:खावर
मात करायची कविता....
जगण्यामध्ये प्रेम ओलावा
आनंद भरायची कविता...

बळ दिले कवितेने
जगायला मला....
काहीच नको ईश्वराकडे
मागायला मला....

माणुसकी जपत जगणे
एवढाच आहे ध्यास....
फक्त अखंड चालत रहावा
माझा काव्यप्रवास....



~ सौ. वंदना कुलकर्णी

# प्रवास माझा - शब्दांच्या गावा

जीवन जगण्याच्या स्पर्धेत
देई विसावा मनास जडलेला छंद
सुख-दुःखाचा चाले पाठशिवणीचा खेळ
छंदासंगे बसे आयुष्याचा अनोखा मेळ ..१

असाच जडला होता छंद
मलाही वाचनाचा
जात होता स्पर्शून अर्थ
मनाला प्रत्येक शब्दाचा ...२

वाटे मला आपण ही
लिहावी सुंदर एखादी चारोळी
जमलंच तर एखादी भावनायुक्त कथा
नाही तर छानशी एखादी कविता ...३

मग हळू हळू सुरू होई
मनात शब्द रचना
पण उतरली नाही कधीच
कागदावर एकही भावना ...४

अन् सुरू झाला प्रवास
आयुष्य जगण्याच्या कलेचा
राहिला मागे थोडा गाव शब्दांचा
पण छंद सुटला नाही कधी वाचनाच ...५

संथ झाली जीवनाची धडपड
अन् दिसली वाट पुन्हा
एकदा शब्दांच्या दुनियेची
नकळत चालू लागले वाट कवितेची ...६

शब्द शब्द आले जुळून
झाली मग एक कविता लिहून
अन् ओसंडून वाहू लागली
प्रत्येक भावना कवितेतून ...७

एकांताला माझ्या शब्दांनी सावरलं
कवितेच फुलं अलवार उमलतं गेलं
असा सुरू झाला छोटासा
प्रवास माझा - शब्दांच्या गावा ...८

दिली वाचनाने शिदोरी शब्दांची
शब्द सुमनांनी फुलत गेली बाग कवितांची
अशातच साथ मिळाली काव्यबंध समूहाची
नकळत ओळख लाभली लेखिकेची ...९

लाभेल काव्यबंध समूहाच्या सोबतीनं
काव्य प्रवासाला नवीन वळणं
दिग्जांच्या पंगतीला उतरेल कविता
मी आणि शब्द होईल नव्याने मिलन ..१०

सजेल मैफिल कवितांची
दरवळेल शब्द सुगंध चहूकडे
अखंड चालत राहीन
कवितेच्या वाटेकडे ..११



~ सुवर्णा बाबर

# हा खेळ शब्दांचा

शब्दांच्या जुगलबंदीचा नेहमी
मी सहजच खेळयचो खेळ
मनापासून लेखणीची सेवा
करायला मला नसायचा वेळ.. १

मुलांची भाषणे लिहीताना
सहजच शायरी करायचो
मित्रांमध्ये चारोळ्या रचून
गप्पांमध्ये रंग भरायचो... २

मनात जुळलेल्या शब्दांची रचना
जेव्हा एका कवि मित्राला ऐकवली
स्वतः च्या नावाने प्रकाशित करून
त्याने मात्र लायकीच दाखवली.. ३

कळाले मज तेव्हा एक
आपल्या प्रतिभेत आहे शक्ती
उठ आता जागा हो...
दाखव जगाला तुझी अभिव्यक्ती. ४

त्याच वेळी या कवि मनावर
एक जोरदार आघात झाला
लाखोंना भारी पडणारा माझा बाप
देवाने अलगद हिरावून नेला.. ५

मोठा होतो घरात मी
रडता येत नव्हतं हंबरून
आई, भावंडांना बघून माझा
जीव जात होता घाबरून.. ६

आभाळ कोसळलं होतं डोक्यावर
पण देणार कोण हो आधार
माझ्या आसवांनी मग आपोआप
घेतली जोर जबरदस्तीने माघार.. ७

मनात भावनांचा कल्लोळकल्लोळ होता
कोणाजवळ होणार मी व्यक्त
सुख दु:ख उतरवले लेखणीत
झालो माता सरस्वतीचा भक्त.. ८

मन मोकळं होता होता
लेखणीला धार येत गेली
भावनांना मोकळे करताना
कविता तयार होत गेली.. ९

खुप रडत स्वतः शीच बोललो
शब्द कागदावर उतरवत गेलो
रिते झाले डोळे अन् मन
कवितेत रंग भरवत गेलो.. १०

प्रेम, आपुलकी, द्वेष, राग
मत्सर ,गहिवर बनली कविता
मानसांनी सोडली साथ पण
जीवनाची प्रियकर बनली कविता.. ११

नकोसी वाटतात नाती गोती
नकोच वाटतो कुणाचा सहवास
जगणे मरणे आता कविते बरोबर
असा माझा काव्य प्रवास.. १२



~ अब्दुलकरीम शमशोद्दीन सय्यद

# स्वातंःसुखाय लेखन

असे विद्यार्थी साहित्यी
मनी जपलेला खास
करी वाचन मनन
लेखनाचा धरी ध्यास १

शिकण्याच्या वयातच
वर्ग आठवीपासून
हाती घेतली लेखणी
सूचे ते लिहिण्या मन २

पुढे सहज सूचलं
असे शीर्षकच दिले
सामाजिक दाहकता
लेखणीने दाखविले ३

छंद लागे कवितेचा
स्वातंःसुखाय लेखन
मिळे इतरा आनंद
वाटे बोनस ते मन ४

वाचनाने मननाने
झाली बैठक तयार
होई काव्याचा वर्षाव
जशी पावसाची धार ५

विविधांगी विषयांनी
काव्य मग बहरले
रसिकांनी मोठ्या मने
साहित्याला गौरविले ६

पुरस्कार मानपान
खूप दिले साहित्याने
आहे सदैव मी ऋणी
साहित्यिक झालो ज्याने ७

अध्ययन, अध्यापन
पेशा शिक्षकी पवित्र
विद्यार्थीही होई दंग
नसे आनंद अन्यत्र ८

झालो वारकरी आता
साहित्याच्या पंढरीचा
भाषा शुद्धीचा आग्रही
नियमात लिहिण्याचा ९

माझ्या काव्याचा प्रवास
सुरू राहोच नेहमी
जीच असेल ती माझ्या
जगण्याची खरी हमी १०



~ पद्माकर दत्तात्रेय वाघरूळकर

# आनंदाचे भाव सारे

शाळेतील मन माझे
शब्द चाले मन वेडे,
छंद लागला एकांती
पळे लेखणीचे घोडे...१

वाचनाची सव होती
शब्द अर्थ भावलेले,
मनातले लिहि वाचे
शब्दांकन सजलेले...२

ओढ लागली शब्दांची
जुळवाजुळव भावा,
मन वढाय वढाय
जाई त्या शब्दाच्या गांवा..३

मन माझे भावनिक
सुखदुःखा आधाराचे,
माझा काव्य प्रवासाचा
देई मोद हा सौख्याचे....४

शब्द शब्दाचे भांडार
वेचलेले शब्द भावे,
प्रसंगानुरूप खेळ
मन जाई दूर गांवे...५

विरंगुळा वाटे मना
मिळे मजला आनंद,
लोक म्हणे कवी वेडा
परी मज हा स्वानंद...६

वयोमाने लेखणीच्या
मीच पडलो प्रेमात,
कल्पनेचा भाव सारा
शब्द स्पर्श आत्मसात...७

साहित्याची संकल्पना
मजेदार शब्द खेळ,
कवी अनंताचे काव्य
विषयानुरूप मेळ...८

काळा परत्वे कविता
छंद मजला लागला,
आनंदाचे भाव सारे
सांगे भाव हे मजला..९

एकमेका साह्य करू
आस धरू लेखणीची,
मनातल्या भावनांना
साथ ही उजळणीची ...१०



~ अनंत तेलंग

# माझा प्रवास



~ के.पी.बिराजदार

गर्दित असुनही मी होतो
अनाथा सारखा मी एकटा
दु:खात भेटला न कुणी
दुसराही कुणी दुकटा

अंधारात भेटले मला
अनोळखीचे काही शब्द
काळजात एक एक ती
होऊ लागली जेरबंद

एक उमाळा काय आला
कागदावर जीव जडला
लेखणीसी संगनमताने
कवितेच्या गळ्यात पडला

असा माझा काव्य प्रवास
धडपडत सुरु झाला
आंधळ्याला मिळाले डोळे
शब्दांचा उठाव झाला

कवितेच्या मी बाहुपाशात
गोडीगुलाबीत शब्दांच्या
गुलाबी स्वप्नात,मनात
विसावलो हाती शब्दांच्या



# टर्निंग पॉइंट

केली मी खूप भाषणे
केली ती कथाकथने
किती लिहिले निबंध
जाता जीवनी वाटेने..
पण आला कसा काय
असा टर्निंग पॉइंट
काव्य लिहिले प्रथम
माझ्या शिवबाचे थेट..
केले सादरीकरण
मिळवला तो विजय
होता कोरोना पाठीशी
ऑनलाईनचे भय..
तिथे आला तो उत्साह
गोडी लागली काव्याची
मग तयार झालाच
काव्यसंग्रहही उंची..
नाव अनुरंग त्याचे
केले मुक्तछंद काव्य
अष्टाक्षरी दशाक्षरी
वाटे सारे भव्यदिव्य..
आज अनेक समूह
आहे मी जोडीत नित्य
सहभागी होऊनच
उपक्रम ते सातत्य..
आज करते मी काव्य
येता समोर विषय
अध्यापना बरोबर
लागे काव्याची सवय..
होते मदत घरची
करी काव्याचे वाचन
होते कार्यक्रमातही
नित्य ते काव्यलेखन..
मिळे काव्यसंग्रहाला
महाराष्ट्र बुक ऑफ
नॅशनल बुक ऑफ
रेकॉर्डची संधी साफ..
कधी वाटले नव्हते
काव्य मी करीन असे
पण कसा मोड आला
काव्य वाटते हवेसे..
माझा काव्याचा प्रवास
कसा वर्णावा कळेना
पण गोडी ही काव्याची
मला शांत बसवेना..
अजूनही विविधांगी
काव्य लिहित राहीन
भाव मनीचे मांडत
नित्य यशस्वी होईन..



~ अनिता मधुकर भोई कुरूंदवाड


काव्यबन्ध
mazablog.online | 7020965224